म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ११२२

संग्रहालय, ठाणें.
वाचनालय शाखा.
विभाग काव्य | क्रमांक १२५३
कमला
स्वा. वि. दा. सावरकर
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.

# कमला

REFBK-0006901
REFBK-0006901

स्वातंत्र्यवीर सावरकर

# कमला

६६०४९
६६०१

स्वा. वि. दा. सावरकर
[ संपादक : प्रा. वा. गो. मायदेव ]

REFBK-0006901
REFBK-0006901

प्रकाशक :

**ग. वि. दामले,**
सावरकर–सदन,
शिवाजी उद्यान,
दादर, मुंबई २८

मुद्रक :

**वि. पु. भागवत,**
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४


तृतियावृत्ति : १९४७
**मूल्य दीड रुपया**

सजावट :
**दीनानाथ दलाल**
सर्वाधिकार :
**स्वा. वि. दा. सावरकर**
**यांजकडे**

एकमेव विक्रेते :

**चित्रशाळा मुद्रणालय, प्रकाशन विभाग**

**पुणें २**



होते सगळे निजले तेव्हां राहुनियां जागा, धीरा !
अंधःकारीं तूं आशेचा शोधिलास धागा !
पतनोन्मुख ह्या हिंदु जातीशी कर हा सांवरिता, जयाचा
'सावरकर' ही अभिधा त्या तव पावे सार्थकता !
वक्ता, विद्वान, लेखक, कविवर, वीर, हुतात्मा तूं, विनायक
अभिनव भारत मनोरथांचा मूर्त दिव्य केतु !

—'केसरी'
ता. ८।११।३०

## पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

[ वीर सावरकरांनीं हें काव्य अंदमानच्या बंदिवासांत लिहिलें आणि त्यांच्या सुटकेपूर्वींच सन १९२२ मध्यें त्याची पहिली आवृत्ति 'विजनवासी' ह्या टोपणनांवानें प्रसिद्धिली गेली. तिच्यासाठीं त्यांनीं बंदिवासांतूनच जी लहानशी प्रस्तावना लिहून धाडली तीही एखाद्या कवितेसारखीच मनोवेधक असल्यानें खालीं पुन्हां छापली आहे. ]

नृशंसक गुहांच्या अंधुक उजेडांत एखाद्या संगत काव्याची माळ पूजेसाठीं गुंफावी म्हणून एकत्र केलेलीं हीं रानफुलें व पानें, त्या माळेचा योग अजूनहि दुर्घटच दिसत असल्यामुळें, तशीं विखुरल्या विखुरल्याच सुकून चाललीं आहेत. गुच्छाकरितांच जीं काटछाटलीं गेलीं; तीं प्रत्येकीं विसंगत नि एकेरी दिसणारच. तरीही रुक्ष, ओसाड नि कांटेरी जंगलांत फुलणारीं, ज्यांना नांव ना गांव, अशीं रानफुलें असतात तरी कशीं, म्हणून जर एखाद्यानें तीं कौतुकानें उचलून घेतलीं, तर कौतुकासाठीं; नाहीं तर वानस्पत्याच्या प्रयोग-शाळेंत पाकळी पाकळी नि केसर केसर तोडला जाऊन ज्ञानदेवीला बळी पडण्यासाठीं; निदानीं अंधारांत सुकायचीं तीं उजेडांत तरी सुकावीं म्हणून;—ही त्या फुलांची पहिली परडी गांवचावडीच्या पायऱ्यांवर आणून ओतली आहे.

—**विजनवासी**

## तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'कमला' काव्याच्या ह्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाचा सुयोग आज जुळून आला याविषयीं आम्हास आनंद वाटतो. या तिसऱ्या आवृत्तीचा विशेष हा आहे कीं, रसिक कवि नि विद्वान साहित्यिक म्हणून महाराष्ट्रांत नांवाजलेल्या प्राध्यापक वा. गो. मायदेव ह्यांनींच ह्या आवृत्तीचें संपादन केलेलें आहे. इतकेंच नव्हे, तर आमच्या विनंतीस मानून ह्या काव्याचा एक 'परिचय' ही त्यांनीं लिहून दिला. ह्या कार्यीं त्यांनीं ज्या आपुलकीनें परिश्रम घेतले त्याविषयीं आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानीत आहों.

सुप्रसिद्ध चित्रकार श्रीयुत दलाल ह्यांनीं जीं सुंदर चित्रें काढून दिलीं त्यांच्याविषयीं आम्ही त्यांचेही आभारी आहों !

—**प्रकाशक**

# ‘ कमला ’ काव्याचा परिचय

लेखक : प्राध्यापक **वा. गो. मायदेव**

स्वातंत्र्यवीर कवि विनायक दामोदर सावरकर यांनीं हें काव्य लिहिलेलें आहे. हें श्लोकबद्ध असून ८८० ओळींचें आहे.

ह्या काव्याच्या रचनेचा इतिहास असाधारण आहे. विनायकराव सावरकर यांना ब्रिटिश बादशाहीविरुद्ध कट व हत्येस सहाय्य करण्याचे आरोपावरून ५० वर्षें काळेपाण्याची व सश्रम कारावासाची शिक्षा झाली. ती भोगण्यासाठीं त्यांना हिंदुस्थानांतून अंदमानांत १९११ च्या जुलै महिन्यांत नेण्यांत आलें. अंदमानांत स्वतंत्र कोठड्यांचा अतिशय मोठा तुरुंग आहे. त्यांत सातव्या चाळींत तिसऱ्या मजल्यावर एका भयाण कोठडींत त्यांना कोंडून ठेवण्यांत आलें. तेथील भयंकर एकाकीपणा विसरण्याकरितां व मनाला गुंतवून ठेवण्याकरितां त्यांनीं एक युक्ति योजली. लहान असतांना त्यांच्या एका आवडत्या विषयावर महाकाव्य लिहिण्याचा त्यांनीं संकल्प केला होता. त्यांच्या वाढत्या नि विविध व्यापांमुळें इतके दिवस त्यांना त्या संकल्पाकडे लक्ष देण्यास अवसर मिळाला नव्हता. त्यांच्या आवडीचा विषय म्हणजे पानिपत हा होय. तो त्यांना आठवला व त्यावर रचना करण्याचें त्यांनीं मनाशीं ठरविलें. त्या महाकाव्याचा एक भाग प्रस्तुतचें ‘ कमला ’ काव्य आहे. या काव्यांतील नायिकेच्या नांवावरून या भागाला त्यांनीं ‘ कमला ’ हें नांव दिलेलें आहे.

ह्या विषयावर लिहिण्याचें ठरवलें खरें. परंतु लेखनास लागणारी अगदीं आवश्यक अशी सामुग्री त्यांना तेथें उपलब्ध नव्हती. काव्य लिहितांना संदर्भाकरितां ग्रंथ हाताशीं असल्यास उपयोग होतो. ‘ वृत्तदर्पणा ’सारखें छंदःशास्त्रावरील सामान्य पुस्तकही जवळ नसल्यानें त्यांचा कितीतरी गोंधळ उडाला. प्रथम अनुष्टुप् हें त्यांना मात्रावृत्त वाटलें. लिहिलेल्या चरणांच्या मात्रा मोजून पहाव्या तर त्यांचा मेळ बसेना. पुढें ‘ अनुष्टुप् छंद तें ज्याला एक नेम नसे गणीं ’ एवढाच श्लोकार्ध आठवला; त्यामुळें तें अक्षरगणवृत्त हें पटलें. पुष्कळ रचनेनंतर ‘ अक्षरें चरणीं आठ ’ हें आठवल्यामुळें त्यांनींच रचलेले पुष्कळ श्लोक त्यांना सुधारावे लागले. दुसऱ्या व चौथ्या चरणान्तीं उपान्त्य अक्षर ह्रस्व हवें ही गोष्टही निरनिराळे श्लोक आठवून ठरवावी लागली. वृत्ताचें स्वरूप ध्यानांत येण्यास असा उशीर झाला. पुढें

ओळी जुळत चालल्या तर त्या मांडण्याची अडचण भासूं लागली; कारण त्या लिहिण्यास लागणारें टांक, लेखणी अथवा पेन्सिली यासारखें साधें साधन जवळ नव्हतें. पण त्यांना भायखळा तुरुंगांत सुचलेली युक्ति आठवली. तेथें ते विटकराच्या तुकड्यांनीं अगर टोंकदार दगडानें भिंतीवर लिहीत होते. इथें त्यांनीं अणकुचिदार घायपाताचा काटा घेऊन त्याचे साहाय्यानें केलेली रचना भिंतीवर लिहून ठेवण्याचा क्रम चालविला. अशा रीतीनें 'कमला' काव्य लिहिलें जाऊं लागलें. ओळी बऱ्याच लिहून झाल्यावर त्यांच्या लक्षांत आलें कीं, त्यांची खोली बदलली गेल्यास अथवा तिला सफेती दिल्यास लिहिलेल्या सर्व रचनेस त्यांना मुकावें लागेल. म्हणून त्या सर्व ओळी त्यांनीं पाठ करून टाकल्या. काव्य लिहिलें जात असतांना हा बंदी कांहीं तरी भिंतीवर लिहितो हें एका पहारेकऱ्याचे ध्यानांत आलें. त्यामुळें विनायकरावांना एकदां तीन व एकदां आठ दिवस हातकडीची शिक्षा भोगण्याचा प्रसंग या काव्यापायीं आला. अशा अडचणींना न जुमानतां दीड पावणे दोन वर्षांत त्यांनीं हें काव्य पुरें केलें. हा झाला ह्या काव्याच्या रचनेचा इतिहास.

ह्या काव्याच्या प्रसिद्धीकरणाचाही इतिहास असाच विलक्षण आहे. कमला काव्य लिहित असतांनाच विनायकरावांची खोली बदलली गेली आणि तिच्यांत प्रयाग येथील 'स्वराज्य' पत्राचे संपादक रा. रामहरि यांना ठेवण्यांत आलें. या सद्गृहस्थाची मातृभाषा हिंदी. परंतु विनायकरावांनीं त्यांना तुरुंगांत मराठी भाषा शिकविली. तेवढ्यावर रा. रामहरि यांनीं भिंतीवर लिहिलेलें 'कमला' काव्य पाठ करून टाकलें. अंदमानांतून रा. रामहरि हे लौकर सुटले. ते कलकत्त्यास येतांच विनायकरावांचे धाकटे बंधु डॉ. सावरकर यांस भेटले. 'कमला' काव्यांतील शेंकडों ओळी त्यांनीं डॉ. सावरकर यांस पाठ म्हणून दाखवल्या. त्यावरून त्या समग्र 'कमला' काव्याची एक हस्तलिखित प्रत डॉ. सावरकर यांनीं सिद्ध केली. १९२१ मध्यें विनायकरावही अंदमानांतून सुटले व त्यांना रत्नागिरीचे तुरुंगांत आणण्यांत आलें. त्या वेळीं एका भेटीचे प्रसंगीं संधि साधून ही हस्तलिखित प्रत त्यांना दाखविण्यांत आली. ती पाहतांच घाईघाईनें त्यांनीं त्या काव्याला 'विजनवासी' या टोपणनांवानें एक लहानशी प्रस्तावना तेथेंच लिहून दिली व तें काव्य खिशांत ठेवण्याजोग्या लहान आकारांतच छापण्यास सांगितलें. १९२१ सालीं

अशी परिस्थिति होती कीं, हें काव्य विनायकरावांचें आहे असें सांगतांच कोणताही मुद्रक तें छापण्यास सिद्ध झाला नसता. परंतु तें 'विजनवासी' या टोपणनांवानें छापण्यास एका मुद्रणालयाचे मुद्रक सिद्ध झाले. ते म्हणजे मुंबईवैभवचे रा. चिं. स. देवळे हे होत. ही व्यवस्था होतांच रा. अनंत हरि गद्रे हे प्रकाशक म्हणून पुढें झाले. प्रकाशकांकरितां डॉ. सावरकर यांनीं पांचसहा ओळीचें लिखाण लिहून दिलें नि अशा रीतीनें 'कमला' काव्याची खिशांत ठेवण्याजोगी चिमुकली आवृत्ति १९२३ मध्यें छापली गेली. पुढें रत्नागिरीसच विनायकराव स्थानबद्ध असतांना 'रानफुलें' या नांवानें रा. ग. वि. दामले यांनीं विनायकरावांचीं कांहीं दीर्घ व स्फुटकाव्यें १९३४ मध्यें छापलीं. यावेळीं विनायकरावांचे मागें अस्पृश्यता-निवारणाचीं व इतर कामाचींही बरींच व्यवधानें होतीं. त्यामुळें पहिल्या आवृत्ती-प्रमाणेंच दुसऱ्या आवृत्तींत बरेच अपपाठ व अशुद्धें राहून गेलीं. ह्या प्रस्तुतच्या तिसऱ्या आवृत्तीचे वेळीं मात्र शक्य तेवढी काळजी घेऊन यांतील ओळ न् ओळ, फार काय शब्द व विरामसुद्धां, विनायकरावांना संमत आहेत अशी निश्चिति करून घेऊन छापले आहेत. हा या आवृत्तीचा विशेष सांगतां येईल.

विनायकरावांना लहानपणीं त्यांचे वडील होमरच्या 'इलिअड' नामक महाकाव्यांतील वीरपुरुषांच्या भाषणाचे उतारे वाचून दाखवीत असत. त्या प्रौढ व गंभीर भाषाशैलीचा परिणाम विनायकरावांवर लहानपणापासून झाला होता. पुढें 'भाऊसाहेबांची बखर', 'पेशव्यांची बखर' व ह्यासारखीं इतर पुस्तकें वाचून मराठ्यांच्या उत्कर्षकालावर महाकाव्य लिहिण्याजोगें आहे हें त्यांना लहानपणींच वाटूं लागलें होतें. नंतर फर्ग्युसन कॉलेजमध्यें शिकूं लागल्यावर त्यांचा 'रघुवंश', 'किरातार्जुनीय' ह्यांसारख्या संस्कृतभाषेंतील महाकाव्यांशीं परिचय झाला. तेथेंच आंग्लकवि मिल्टनच्या 'पॅरडाइझ लॉस्ट'चा कांहीं भाग अभ्यासण्याचा त्यांना योग आला. त्या काळांतच इटालिअन कवि डान्टेचें 'डिव्हाइन कॉमडिआ' हें महाकाव्य त्यांना पहा-वयास सांपडलें. या सर्व ग्रीक, संस्कृत, इंग्रजी व इटालिअन महाकाव्यांची थोडथोडी छाप आपणांस 'कमला' काव्यांत आढळते.

रामायण—महाभारतासारखे प्रचंड इतिहासग्रंथ विनायकरावांनीं अनुष्टुपसारख्या लहानग्या छंदांत यशस्वी रीतीनें लिहिलेले पाहिले. त्याप्रमाणें

पानपताच्या अंवतीभवंतीचा काल घेऊन त्यांत घडलेलीं रोमहर्षक प्रसंगांचीं कथानकें घेऊन त्यांवर उपाख्यानें, आख्यानें व पर्वें त्यांना लिहावयाचीं होतीं. त्या कल्पनेनुसार 'कमला', 'विरहोच्छ्वास', 'महासागर', 'गोमंतक' वगैरेंची उभारणी त्यांनीं केली. परंतु रामायण-महाभारतादि इतिहास-काव्यांतून निरनिराळ्या अलंकारांचा उपयोग मोठ्या प्रमाणांत करण्यांत येत नाहीं. तो रघुवंशासारख्या महाकाव्यांतून मात्र आढळून येतो हें आठवून तशीच अलंकारप्रचुरता, श्रुतिमाधुर्य व कल्पनाविलास 'कमला' या काव्यविभागांत त्यांनीं आणण्याचें ठरविलें. मिल्टन कवीची शैली पॅरेडाइज लॉस्टमध्यें बारकाईनें पाहिल्यामुळें चरणाच्या शेवटीं कल्पनेला विराम पावूं न देतां ती अखंडितपणें कित्येक ओळींपर्यंत चालू ठेवण्याची मौज त्यांना लिहून पहावयाची होती. महान् पुरुषांच्या उल्लेखाचा विस्तृत पट दाखविल्यानेंही रचनेस एक प्रकारची भव्यता आणतां येते हें त्यांना पटलें होतें. तात्पर्य, महाकाव्य हा शब्द ज्या ज्या रचनांस लावण्यांत येतो त्यांतील एकेक विशेष 'कमला' काव्यांत त्यांनीं योजून पाहिला आहे.

विनायकरावांनीं महाकाव्याच्या रचनेस प्रारंभ केला खरा, परंतु महा-काव्य शब्दानें प्रतीत होणाऱ्या वरील ग्रंथांचा संग्रह बंदीशाळेंत त्यावेळीं त्यांच्यापाशीं मुळींच नव्हता. पानिपतकालीन महाराष्ट्रावर लिहिण्याचें ठरवलें, तरी तत्कालीन ऐतिहासिक बारीक बारीक माहितीचीं साधनें कारागृहांत मिळणें शक्य नव्हतें. 'कमला' काव्यांतील कथानक महाराष्ट्रांतील अमक्याच एका विभागाचें आहे असें अनुमान करण्यास लागणारा ओझरताही प्रादे-शिक उल्लेख या काव्यांत आढळत नाहीं. कोणत्या एका विवक्षित महाराष्ट्रीय समाजाचें वा ज्ञातीचें वर्णन त्यांत आलें नसून सामान्यतः तें पांढरपेशा वर्गाचें आहे एवढेंच काय तें म्हणण्याजोगें आहे. पानिपतकालापूर्वीचें कथानक घेतलें, तरी त्या वेळच्या इतिहासाचा अगदीं थोडा उल्लेख या काव्यांत आलेला आहे.

विनायकरावांचे मनापुढें संस्कृत कवींच्या रचनेचा आदर्श प्रामुख्यानें असल्यामुळें प्रौढ, अलंकारयुक्त व सुसंस्कृत अशी रचनापद्धति त्यांनीं स्वीकारली आहे. अगदीं बालबोध काव्य लिहून तें आबालवृद्ध मराठी वाचकांस सहज समजेल अशा सोप्या मराठींत लिहिण्याचा आग्रह त्यांनीं धरलेला नाहीं. संस्कृत वाङ्मय व साहित्य यांशीं परिचित असलेल्या सुजाण,

व्युत्पन्न व रसिक वाचकांकरितांच त्यांनीं हें काव्य लिहिलें आहे. तेव्हां केवळ मराठी वाङ्मयाशीं ओळख असलेल्या वाचकास हें काव्य वाचतांना जरा अवघड वाटलें तर त्यांत आश्चर्य नाहीं.

कथा लिहिण्याचे प्रकार दोन; एक काव्य-कथेचा व दुसरा कथा-काव्याचा. इंग्रजींत जिला A narrative poem म्हणतात तशी 'कमला' ही काव्यकथा नाहीं. काव्यकथेंत काव्याला गौणत्व असून कथेला प्राधान्य असतें. काव्यकथेंत मनोरंजक विषय, व्यक्तिमान् पात्रें, अद्भुतरम्य घटना, अनुकूल वृत्त व कुतूहल जागृत ठेवणारा भाषेचा अखंडित ओघ लागतो. वरील काव्यगुण असलेल्या Michael, St. Agnes Eve, Mazeppa's Ride, Ancient Mariner वगैरे काव्यकथा इंग्रजी भाषेंत आहेत. 'कमला' ही त्या धर्तीची काव्यकथा नाहीं. 'कमला' काव्यांत विषय नित्य परिचयाचा, पात्रें विकास न पावलेलीं, घटना साधी, वृत्त श्लोकासारखें सोपें व शैलीचा ओघ कुतूहल जागृत ठेवून खेचूं न शकणारा असा आहे. असें असूनही सर्व काव्यभर कल्पनाविलासामुळें रम्य वातावरण निर्माण होऊन शेवटपर्यंत वाचीत जाण्यास आनंदाचा लाभ होत जातो. कांहीं वेळां कल्पनाविलास तर कांहीं वेळां मुग्धशृंगार, कांहीं वेळां नर्म विनोद तर कांहीं वेळां उदात्त विचार, कांहीं वेळां शब्दचमत्कृति तर कांहीं वेळां पदलालित्य, कांहीं वेळां स्वरमाधुर्य तर कांहीं वेळां अर्थगांभीर्य याचा आस्वाद घेत घेत आपण 'कमला' काव्याचे शेवटापर्यंत जातों. त्यांत कथेला जरा गौणत्व व काव्यालाच खरें प्राधान्य आहे. एकाद्या भव्य शिल्पमंदिरांत दर पावलागणिक नवनव शिल्पचमत्कृति आढळून प्रेक्षक जसा थक्क होऊन मोहून जातो, तसें पानें, फुलें, बाग, तरुण वा तरुणी, माता, सासू वा मित्र या कुणाचेंही वर्णन येवो, कांहीं तरी आल्हाद वाटेल असें नावीन्य, असें सौंदर्य किंवा असा विलास प्रकट केल्यावांचून या काव्यांत एक पाऊलही पुढें टाकलें जात नाहीं. अशी मौज शेवटपर्यंत वाटूं देत देत कथा संपविणें हें एक अजब चातुर्य आहे व त्याचा नमुना या काव्यांत आपणांस पहावयास सांपडतो. 'त एव पदविन्यासा त एवार्थ विभूतयः। तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ।' असें अद्भुत कौशल्य ह्या काव्यांत आहे. म्हणून त्याला A poetic narration म्हणजे कथा-काव्य म्हणावयाचें !

कालिदासाचीं रघुवंशादि काव्यें कथा-काव्यें आहेत. त्यांत कथाभाग थोडा, चिरपरिचयाचा व कथा कुतूहल जागें ठेवून खेचणारा नसतो. त्यांत कल्पनाविलासाचीं कारंजीं, अतिमाधुर्याचे नूपुरनिनाद, अर्थगांभीर्याचे मंत्र-घोष, सृष्टिसौंदर्याचीं इंद्रधनुष्यें दाखवणें यांतच कवीची करामत आहे. ती पहात, ती ऐकत, ती अनुभवीत एकाद्या गाढ जलाशयांत पोहणाऱ्या तरणपटु जनाप्रमाणें वाचक तरंगत पुढें सरकत असतो. तीच मौज 'कमला' काव्यांत आहे.

तात्पर्य हें कीं, या काव्यांत काय सांगितलें आहे यापेक्षां तें कसें सांगि-तलें आहे ह्याला महत्त्व आहे. भावनांना एवढें महत्त्व दिलेलें नसून कलेला दिलेलें आहे. आतां अत्यद्भुत कला प्रकट करणारा मनुष्य नुसता बुद्धिप्रधान असतो व तो मौलिक भावना प्रकट करूं शकत नाहीं असें थोडेंच आहे? पण कथा-काव्यांत तो हेतुतःच आपला आविष्कार प्रच्छन्न ठेवतो. आत्मपर भावगीतांत तो अत्यंत सुस्पष्ट केलेला असतो, पण कथा-काव्यांत पात्रें निर्माण करून एकादी घटना गुंफून त्या अनुरोधानें उत्पन्न झालेल्या प्रसंगांचें, देखा-व्यांचें वर्णन करीत अगर पात्रांचे विचार प्रकट करीत तो पुढें जात असतो. त्याची चातुरी कांहीं वेळां एवढी असते कीं, त्या पात्रांचें बोलणें स्वतंत्र व जिवंत वाटतें. मग त्यांचे विचार वा वर्णन वाचीत वाचकही सानंद पुढें सरसावत असतो.

अशीं मनोवेधक वर्णनें वा उद्गार 'कमला' काव्यांत अनेक ठिकाणीं आले आहेत. उदाहरणार्थ, 'प्रियाच सोनचाप्याची चमेली ही किती खुले। तो तिच्यावरि ती त्याच्यावरतीं उधळी फुलें' या ओळींतला वेलीवर आरो-पित केलेला खेळकरपणा हृद्य वाटला, तर 'आला लुब्ध अलीही तों सोडुनी नलिनी परी। मेला माझ्याचि ओंठाला दंश येउनियां करी' या ओळींतला कमलेचा मुग्धपणा आपणांला मोहक वाटतो. 'आणि काय करावें हो त्यानेंही वरचेवरी। वस्त्र, पुस्तक कांहीं ना कांहिं राहि तया स्थलीं' या ओळींतील नर्मविनोद आपणांस आनंदवूं शकला, तर 'श्रीराममंदिरीं ना श्रीकाममंदिरिं सुंदरी' या ओळींतील प्रेमलेचा थट्टेखोरपणा आपणांस सुखवतो. 'वेणी होतांच सासू दे जी पाठीवर त्या दिशीं। थांप ती आइच्या लागे चुंबनाहुनि गोडशी' या ओळींत कमलेला होणारा आनंद वाचून आपण प्रसन्न झालों, तर 'जोडपें तें खुले जैसें चंद्र आणिक रोहिणी' हे सहजोद्गार वाचूनही

आपण उल्हसित होतों. ' हिमालयीं व्रतीं जैसी असावी दिसली उमा ' वा ' श्लोकांत कालिदासाच्या उपमाच जशी दिसे,' किंवा ' फसवो न वसंताची तुला मोहकमंजिरी ' अथवा ' स्वनांत सनयांच्या कीं जसे मंजुळ चौघडे,' असें गोड, हळुवार व रम्य दर्शन मुंजुळ शब्दांत कवीही सलील करीत असलेला पाहून आपणांस जर आनंदाच्या लहरी उत्पन्न होत असल्या, तर ' अर्धमुक्तचि तैं अर्धांगीच्या बाहुलतेंतुनी । होय रे सखया जाणें हाय ह्या विषमीं रणीं । भीति धीटहि तैं द्याया प्रीतिचा असल्या हवी । चलती अचलांचीही शिखरें पडतां पवी ' असले घोर निर्धाराचे उदात्त उद्गार वाचूनही आपण क्षणभर स्तिमित होऊन जातों.

काव्य संपवून वाचक क्षणभर विचार करूं लागला, तर मात्र या कलाकृतीचे मागें असलेल्या कविमनाचा साक्षात्कार त्याला हळुहळु निश्चितपणें होऊं लागेल, आणि मग नारळाचीं सालें सोलत व कोलूचा दांडा फिरवीत, केवळ एकाद्या बागेचें अगर मुलीचें वर्णन करीत हा कवि आपल्या मनाला विरंगुळा देऊं शकत असेल ही कल्पनाच अशक्य वाटते. भावनाप्रधान, हौशी, खेळकर उद्गारांवरून कवीच्या मनाचा तो एक भाग जरी प्रतीत झाला, तरी अल्पावकाशांतच त्याच्या मनाच्या दुसऱ्या भागाचा, सुसंस्कृत, दुर्दम, चेतन व साहसी स्वभावाचा साक्षात्कार वाचकास होऊं लागेल. आपल्या धर्मांतील लौकिक आणि धार्मिक लग्नसंस्कारांमागचा परिचायक व उदात्त हेतु कवीनें अगदीं नकळत पटवून दिल्याचें त्याचे ध्यानांत येतें. ह्या भारतांत होऊन गेलेल्या अनेक विभूतींचा भाषणांत उल्लेख करून त्यांनीं पावन झालेल्या देशाचें दुष्टांपासून रक्षण करणें हें थोर कर्तव्य आहे हें पटवलेलें वाचक पाहतो न पाहतो, तोंच कवीनें आपले जीवनाचें हें रहस्य सांगण्यासाठीं तर हें काव्य लिहिलें नाहीं ना असें वाटून काव्य म्हणजे कवीचा आत्म–आविष्कारार्थ केलेला शब्दविलास होय, याचा त्याला सहजच प्रत्यय येतो.

आपल्या अपूर्वतेनें मराठी भाषेला ललामभूत झालेल्या या चिमुकल्या परंतु पाणिदार मोत्यासारख्या मनोहर काव्याविषयीं याहून जास्त न लिहितां माझे दोन शब्द येथेंच पुरे करतों.




कमला



# कमला

फुलबाग किती शोभे लहान, नटवी, करी
नटुनी थटुनी नाना नखरे वरचेवरी;
हिरवाचि कधीं शालू, सित मलमलिचा कधीं,
रेशमी जरतारी वा जयाच्या पदरामधीं
नित्य ताजे जिते मोतीं पाच माणिक जन्मती;
पवनेंच तसें त्यांसी नटवी डुलवी किती!
हांसतां कुंददंती ती जितमन्मथ मोहवी :
सुगंध सौम्य हास्याची ज्या चोरूनि नवी नवी
कला एकेक या लोकीं कामिनी सकला करी
निज मोहक लावण्या, तिजसी मुकुटा धरी!
नौकेंत कौमुदीच्या ही रतली कितिदां तरी
बाग योजन-गंधा त्या वनदेव-पराशरीं!
पथानें फुलबागेच्या दों बाजूं सम शेवरी
आवली धरुनी होत्या डौलदार; यशें वरी

---

**ओळी :** ३ सित–शुभ्र. ५ ताजे जिते मोतीं–निरनिराळ्या रंगांचीं सचेतन फुलें. ७ कुंददंती–कुंदाच्या फुलांची बाग, श्लेषानें कुंदकळ्यांप्रमाणें सुंदर दांत असलेली स्त्री. जितमन्मथ–शंकर. ९ कला–बागेच्या बहरांतील एकेक फूल. सुंदरी आपल्या केसांत तें खोवून आपल्या सौंदर्यावर मुकुट चढवितात. तिजसी–कलेसी : अर्थात् फुलाला. ११–१२ पराशराचे वरानें सुगंधि झालेल्या मत्स्यगंधेनें जसा पराशराबरोबर चांदण्यांत नौकाविहार केला, तसा कित्येक योजनेंपर्यंत वास दरवळणारी ही फुलबाग वनदेवाबरोबर चांदण्याचे नौकेंत तसाच विलास करीत असे. १३–२२ या शेवरी पहारा करणाऱ्या शस्त्रधारी स्त्रिया आहेत असें भासतें.

भाट बुल्बुल गाताती; या शेंगा हिरव्या, फुलें
लाल हीं लडतां त्यांसी भासे चित्तांत चौफुले
जित्या माणिक पाचांचे जडवूनि मुठीवरी
तशा मरकतांच्या कीं म्यानांमाजि असी करीं
सदा लटकती ज्यांच्या, अशी सुंदर भीषणा
स्थापिली तरुणीसेना निजांत:पुररक्षणा
प्रतीहारी-पदीं का ही वसंतें ! दे पिक-स्वना
ललकाऱ्या पहाऱ्यांच्या ती ह्या क्षेमनिवेदना !
मांडवी ही प्रवेशाची जाईनें विणिली जिला;
फुलें हीं हंसरीं येत्या आदरीती पलोपला !
फुलें ? अहा, फुलें ना तीं, उद्यानीं विहरावया
रात्रींत चोरुनी येतां अप्सरा धरिलें जयां,
नोंद त्या दिव्य पाप्यांची ठेवूं जाइवरी असे
चुंबनांचेचि त्यांच्या घे देवी द्वारप हे ठसे !
वीथिका कदलींची ही उद्यानांतिल मर्मरी
तया सुरेखिल्या पाथाचिया दो तटिं शोभली,
येत्या-जात्यावरी मर्यादेनें आनतशा शिरीं
वारी विंजण वाऱ्यासी, आतपत्र अणी धरी
निर्गंधते करी क्षम्या नम्रता कर-जोडिती
अशीं केळफुलें, गोऱ्या गोड केळफण्या किती,

---

**ओळी** : १८ मरकत—पाचू. २१ प्रतीहारीपदीं—स्त्रीरक्षकांचे जागीं. पिकस्वना—कोकिलकंठी बाग, श्लेषानें स्त्री. २४ येत्या—येणाऱ्यास. २८ द्वारप—द्वारपाल. बागेंत चोरून आलेल्या अपराधिनी अप्सरा स्वर्गांतल्या म्हणून द्वारपाल देवींनी त्यांचे ( इतर सामान्य अपराध्यांचे आंगठ्यांचे ठसे घेतात तसे न घेतां ) चुंबनाचे ठसे वेलींवर घेतले. तेव्हां तेच चुंबनाचे ठसे फुलांसारखे भासत होते. २९ कदलींची वीथिका—केळींची ओळ. ३२ आतपत्र—उन्हापासून रक्षण करणारें छत्र. ३३ करजोडिती—हात जोडणारी ( नम्रता ).

दलें सुलोल हीं सारीं दाटतां मिसळोनि, ते
अव्यवस्थितशी शोभा बघुनी मनिं भासतें !
कालिंदी-पुलिनामाजी जयांहीं उपभोगिला
यथेच्छ वनमालीसी, पूर्त, तृप्त, सुशीतला,
भुक्तकामा, रतिश्रान्ता, आत्मा एक जयां हरी–
सखी म्हणूनि ज्या झाल्या, समतृप्त परस्परीं

विगतेर्षा म्हणूनी या–जातां वल्लभ त्याच का
अशा शून्यमना मार्गीं उभ्या ह्या व्रजगोपिका
कंठांत एकमेकींच्या घालुनी करपल्लवा,
जातांही हरि तैशाचि कुड्मलाञ्जलि, अन्य वा
लोल कोमल पंख्यांसी कुणी पालवितां करीं
गाला गालासि लावोनी मागली पुढती वरी
हेमगौरमुखी कोणी सनाल अपुल्या सखी
स्कंधीं सखीचिया ठेवी पाठिशीं लगटूनि कीं !!
शेवंती ही; हरीं गेला चढाई करुनी तदा
कुसुमाकर ही कल्पी ढाल कीं कुसुमायुधा !

आणि हे सोनचांप्या, तूं शिकलासि तरी कुठें
ही दिव्य किमया ? आम्हां स्वयंमन्य नरां जिथें
रुप्याचेंही करायासी जड स्वर्ण न साधतें
ओल्या मातींत सूर्याचीं किरणें पिळुनी तिथें
मृदुचेतन सोन्याचीं, स्वर्णचंपक ! हीं फुलें

**ओळी** : ३५ सुलोल–डौलांत हलणारी. ३६-४८ या ओळींत कदलींचें साम्य गोपींशीं उत्प्रेक्षेनें दाखविलें आहे. ३७ कालिंदी-पुलिनामाजी–यमुनेच्या वाळवंटांत. ४४ कुड्मलांजलि–उमलणाऱ्या कमळाप्रमाणें ओंजळ केलेल्या. हे आणि पुढील शब्द केळींच्या आणि गोपींच्या दुहेरी वर्णनास व्यक्तविणारे द्व्यर्थी आहेत. ४९ हरी–शंकरावर. ५० कुसुमायुध–मदन. कुसुमाकर–वसंत. ५५ मृदुचेतन–कोमल व सजीव.

सुगंधी तुज पाहूनी निर्मितां मन हें भुले !
प्रियाच सोनचाप्याची, चमेली किति ही खुले
तो तिच्यावरि, ती त्याच्यावरती उधळी फुलें !
जातिनें शुचिवर्णा जी, जी भूषा ललनाजना,
याचकांच्या सदा झुंडी झुलती मधु-भोजना
दानशूर जिच्या दारीं, देवाच्या सुभगा पदा–
कीं शशी स्वकला तैशी शकलां तनुच्या सदा
अर्चीं जी अर्पुनी;-साधूं स्वार्थ ? ना, लवलेश ना,
परी केवळ कल्याणा लोकांच्या, मुनिसाधना
करूं सांग, तयां देऊं मोक्षमुक्ति, पडे गळां
गौरी गौरीहराच्या जी निष्कामा–अजि तूं भला–
तया ह्या केतकीच्या, हे गंधवाह ! दिशा-दिशां
प्रसिद्ध गुणगंधाच्या करिसी धवला यशा
आणि मात्र यशातेंची ! खरी खोटी कशी परी
उक्ति कुत्सित कीं हीच्या भुजंग लपती घरीं,
अवाक्षरहि ना तीचें वदतां तुज तेंच कीं
पावना पवना, शोभे ! स्वार्पविन्मुखता निकी
ही ज्यांची, मंगला लाखों लोकांच्या झिजतीं, जयां–
विना वसुंधरा व्हावी अल्परत्ना, अशा तयां
जगद्धर्मीं महात्म्यांच्या गृहस्खलित मानिती
स्पृहणीय न तत्रापि गोपनीयचि सन्मती !

---

**ओळी** : ५९–७६ हे शब्द आणि पुढील वर्णन केतकीच्या आणि कोण्या दानशूर प्रसिद्धयश महिलेच्या वर्णनास एकत्र व्यक्तविणारें द्यर्थी आहे. जसें, शुचिवर्णा-रंगानें गौर किंवा शुद्ध कुळांतली. ६२ शकलां–खंडांस. चंद्रकला देव पाळीपाळीनें पितात : पर्यायपीतस्य सुरैर्हिमांशोः कलाक्षयः श्लाघ्यतरो हि वृद्धेः–कालिदास. ६५ सांग–पूर्ण. ६६ गौरी–पार्वती, श्लेषानें शुभ्र केतकी. ६७ गंधवाह–वारा. ७० भुजंग–सापपक्षीं प्रच्छन्न प्रियकर. ७६ स्पृहणीय–अनुकरणीय.

पुन्हां हुडकितां मातें फिरे काय असा अतां
क्रुद्ध हा त्या त्रिनेत्राचा तिजा नेत्रचि जाळिता;
पाहूनि भास्करा भारी खाई धास्ति अनंगही
कीं दुःखें पोळली जिव्हा पी ते फुंकुनि ताकही
म्हणुनीच गमे नेमीं मीनकेतन हा खुळा
गुप्तहेरचि सूर्याच्यावरी, सूर्यफुला, तुला !
तरीच तूं सदा डोळा ठेवितोसि रवीवरी
अनंग तरिची दंगा भारी रात्रिंतुनी करी !
नाना बालतरू देशाविदेशांतिल आणुनी,
फुलें किती अशीं ज्यांचीं पानें रंगित देखणीं,
तशींच फुलझाडेंही विचित्र नटवी किती,
कुंड्यांकुंड्यांतुनी होतीं गुच्छांहीं रचिलीं पथीं
भंवतीं फुलबागेच्या वर्तुलाकृति रेखिले
तृणस्तबक जे गार हिरवे हिरवे खुले;
प्रभातीं तृणवेलींसी त्यांतल्या धवलीं अती
अती चिमुकलीं, लाखों फुलेंही फुलतां किती
मनोज्ञ तरि ती शोभा ! यामिनींत, गमे हृदीं,
होती वहात जी येथें ज्योत्स्नेची रसिता नदी
प्रभातिंच्या हिमें का ती घनीभवन घे नवें;-
चकाकती फुलें ना हीं, चांदण्याचे रवे रवे !!
वशीकरणचूर्णासी देत त्यास तिला हरूं,
मंत्र गुंजत त्या भोगक्षमा ज्या कलिका करूं,

**ओळी :** ७८ त्रिनेत्राचा—शंकराचा. ८० पी—पिते. ८१ मीनकेतन—मदन. ८२ सूर्यफूल सूर्याकडे बघत फिरतें ही लोकोक्तिच आहे. ८४ तरीची—रात्रींत सूर्य पाहील ही भीति नसल्यामुळें. ९३ मनोज्ञ—सुंदर. ९४ रसिता—चकाकणारी नी प्रवाही. ९६ रवे रवे—कणकण. ९७ वशीकरणचूर्ण—वश करणारें चूर्ण, श्लेषानें फुलांचे पराग. ९८ ज्या कलिका त्या भोग-क्षमा करूं, असा अन्वय.

ह्या पुष्पा वश त्या पुष्पीं करवीत परोपरी
हिचें चुंबन दे त्यासी, ह्याचें देत हिला, अली

दयितादयितांमाजी सुमलोकांतल्या पहा
घाली खेपा मधावारी मदनाचा दलाल हा !
धोतऱ्याचीं महादेवा फुलांत रुचलीं फुलें,
गुणांधत्वहि मोठ्यांचें मोठेंचि असणें बरें !
फूल ह्या निशिगंधाचें ! हें अधीरवितें हृदें
कामसेनापुरोगामी रौप्यशृंगचि काय तें !
छोटेंसें स्फटिकांचें हें अष्टपैलु मधें खुले
लीलासर, सदा पूर्ण स्वादु शीतलता जलें;
कारंजें शतधारांचें कासारांत तया उडे
नर्तद्बिंदूवरी त्याच्या तेजोबिंब यदा पडे

तदा गमे असा लीलासरा उडत ये तया
थवा इंद्रधनुष्यांच्या पिलांचा विहरावया !
जलार्धमग्ननाला ह्या शोभती नलिनी तशा
शोभती लाजल्या गोपी यमुनेंत तईं जशा;
हृच्चोर पोर नंदाचा वसनें हरि ज्या क्षणा
आणि त्या प्रिय पाप्याच्या हट्टी तुष्ट करूं मना
शक्य तों नग्न तन्वंगें करूनि वरती जला,
“ दे न रे हरि, वस्त्रें तीं ! ” गोपी यांचिति आकुला !
—नायकेचि परी खोटा, “ या तशाच ” म्हणे “ वरी !”
छंदें त्या कीं मृगी तैशा होत कार्षित सुंदरी

---

**ओळी** : १०० अली—भुंगा. १०५ अधीरवितें—अधीर करणारें. ११० नर्तद्बिंदूवरी— नाचणाऱ्या थेंबांवर. ११३ जलार्धमग्ननाला—पाण्यांत अर्धवट बुडालेल्या देठांच्या. ११७ तन्वंगें—कोमलांगें. वरती जला—जलावरती. ११८ रे हरि, दे न तीं वस्त्रें !—अशा बोलण्याचे लकबीनें. १२० छंदें—हट्टानें, पक्षीं मंजुळस्वरानें.

आल्या तीरीं अहा, तीरावरी नवनवें तधीं
लावण्याचे पुटांतूनी पुट दिव्य पदोपदीं
घेत घेत विकासा जें रविसी नमिती करें,
वायु निश्चेष्ट, सूर्याचे अंशु आनत, आदरें
करीत तई जे देवप्रिय दार्शित जाहले
विश्वमोहन मद्याचे पेले, चेतन पोवळे
जीवनाच्या उषा ज्या, जीं हृदयें रतिचीं निकीं
प्रेमकल्प सुमें तीं हीं–फुलले न गुलाब कीं !
देवताची तया आरामाची काय मनोरमा
बाला एक अशी येई वेचूं नित्य तिथें सुमां
ढाळी बाग सुमां मार्गीं मार्दवा बघुनी तिशी
प्रतिपद् चांदण्या येतां व्योमीं चंद्रकला जशी
चंद्रिकेच्या प्रभाताच्या मिश्रणांत उषा जशी
कैशोरयौवनांमाजी शोभे ती सुदती तशी
तुषारमय धारांच्या झाऱ्यांहीं सुजलांत ती
शुचिस्मिता स्वयें न्हाणी वेली-पुष्पलतांप्रती;
पुशी मल्मलिनें त्यांचीं पानें, साहस ना परी
मऊ मल्मलिनेंही ती पुसाया कुसुमें करीं;
पाकळ्यांनीं गुलाबांच्या पुशी अन्य सुमें अणी
ओंठांच्या पाकळ्यांहीं ती गुलाब नव चुंबनीं
पयोघटीं स्वयें द्यावें पयःपान तिनें असा
ग्रीष्म वर्षांहुनी व्हावा त्या बागेसि पसंतसा
लुप्तान्ह श्रावणाच्या त्या झडींत उघडें जरा
होतांचि, भानुच्या कोंव्ळ्या किरणासम तत्पला

---

ओळी : १२४ अंशु–किरण. १२९ आराम–बाग. १३२ प्रतिपद्–प्रतिपदा तिथि. १४१ पयोघटीं–पाण्याच्या कळशांनीं. १४२ ग्रीष्म–उन्हाळा. वर्षा–पावसाळा. १४३ लुप्तान्ह–दिवस झांकळलेल्या.

लतांत शिरुनी, तोयें करी आकुल फार ते
फुलांचे कमलांचे ती पेले ओतुनिया रिते
खाती लताफुलें ऐसे किडे मात्र दुरूनिया
तियेनें सेवकाहातीं हळूच धरवूनिया
ज्यांत आंथरिलीं पानें फुलेंही गळलीं अशा
पेटाऱ्यांतुनि द्यावें कीं रानीं धाडुनि दूरशा

लीलावती जरी कैं ती लतेच्या बसली तळीं
विणीत कशिदा चोळीवरी सुकुशला तरी
अल्पकाळेंचि ओशाळें व्हावें तन्मन; "सत्य तें!
किती आप्पलपोटी मी! नकोस रुसुं अं, लते,
आलवालीं तुझ्याही मी घे, नवा कशिदा भरीं"
असें कूजतचीं प्रेमें आलवालाचियावरी
रम्याकृतींत पेरूनी नांव दे अपुलें अणी
नांव त्या लतिकेचेंही निज चोळिवरी विणी
राईराईपरी भारी देखण्या जैं फुलांमधीं
फुले आकृति, ती काढी चोळी वापरण्या तधीं

केव्हां केव्हां सुमांभोंतीं भ्रमरांची सुचाटुला
ऐकतां सलगीची ती कुजबूज, "अरे मला
सांग गुंजत भुंग्याशीं काय तूं असती तरी
फुला, बोल न माझ्याशीं, गुजगोष्टि तशा करीं!"
लतेसी लावुनी गाला लाडानें वदतां असें
सुमाशीं सुकुमारी ते श्रमणा श्रवुं नेतसे!
पदाघातहि हे जीचा अशोकासि विशोकता

**ओळी :** १५१ कैं–केव्हां. १५६ आलवाल–आलें. १६१ सुचाटुला–मंजुळ, गोड वाटणारी. १६६ श्रवणा–कानास. १६७ पदाघात : कविसंकेत आहे कीं कामिनींच्या पदाघातानें अशोकाचे आणि कामिनींच्या मद्याच्या चुळांनीं बकुलाचे दोहद ( डोहाळे ) पुरतात.

गालची ललनेचा त्या असा कोमल लागतां
यावी वज्रासहि वाचा ! हीं तों काय लताफुलें !–
असें मंजु वदावीं कीं भासे बुल्बुल बोलले ! !
प्रात:काळीं तिची सासू हौसेनें कथितां कधीं
“ वेणीस, जा, फुलें बाले, आण आवडलीं हृदीं ”
बागेंत तैं तिनें जावें परी हात न लावितां
पहावें जरि होऊनि ढाळिती कुसुमें लता :
आणि, सत्य कथीं, केसां तिच्या मोहुनि मोकळ्या
फुलें काय–लतांनीं त्या ढाळाव्या फुलत्या कळ्या !
निजाभरणकार्यींची असे न मन तें, परी
देवपूजेसही तीचें खुडाया न फुलें करीं :
कीं फुलें खुडितां ये जो रस तो बघुनी हृदीं
वाटे रक्त लतांचें ये, सासू जों न असें कथी
देवकार्यीं, अहा बाले, लतांचींच सुमें किती,
यौवनाचीं सुमें वीरप्रसू तोडुनि अर्पिती ! !
बागेंत चांदण्या रात्रीं कैं सलील सुमोहना
रमे इतस्तत: जैशी प्रीति-स्वप्निं सुचेतना !
तिनें कमलिनी येतां द्यावीं वाजुं न पाउलें
सुखें निद्रित कीं, जावें पाहुनी इतुकें पुढें
खालुनी पारिजाता ती जातां त्यासि निजेमधीं
स्वर्गीचीं सहसा स्वप्नें लागावींत पडूं तधीं :
आणिला भांड भामेनें खालीं, पासुनि त्या दिना
स्वर्ग आज दिसे ! गाळी तो सुखाश्रु सुमांसि ना ! !
लहानपणिंची झालें तिचें लग्न; तया दिना

**ओळी** : १८५ कमलिनी रात्रीं फुलत नसून मिटून जातात, निजतात, हा कविसंकेत. १८९ भांड–भांडखोर. सत्यभामेसाठीं कृष्णानें पारिजात स्वर्गांतून खालीं आणला अशी कथा आहे.

पासूनि या सुमां सोडूं व्हावें दुःख असें मना
कीं घे माहेरिंही जातां पाय मागुति मागुती
मायशी जों तिची सासू असें न समजाविती
" उगी, उगी, मुली, येसी तों तुझीं लतिकाफुलें
ठायीं तुझ्याच मानूनी प्रतिपाळिन मी बरें "
येतां त्या मंगलागौरी कोण उत्सव तो मना !
सुशुभ्र-वसना, शुद्धा, उद्यानीं निज शोभना
जातां वेचित पुष्पांशीं ये सुश्वेत जिथें तला
मोगरीच्या फुलांचा कीं दाट दूरवरी सडा
तदा दिसे समावोनी त्या फुलांत मनोरमा
हिमालयीं व्रतीं जैसी असेल दिसली उमा !
वनोपवनिंच्या नाना पाकळ्या, कलिका, किती
मंजिऱ्या त्या, दलें तीं, तीं फुलें, रानफुलेंहि तीं—
रंग रंग निराळेची ! परड्यापरड्यांतले !
गुलाब, कमलें, चांपे, बकुलें, बटमोगरे !!
पूजेसी जैं बसे भोंतीं ही रचूनि दलें फुलें
कल्पनांच्यामधें जैसी कविताच तशी खुले !!
पत्री वाहवुनी कांहीं, पूजा सांगुनिया, घरीं
जाती द्विज; तदा भावें स्वयेंचि मग सुंदरी
मंगला मंगलागौरी गौरी तोषविण्या मनीं
वाही दलें फुलें तीं तीं नांवें घेउनि घेउनी :
सुरंगांच्या सुगंधांच्या त्या सुरेख कुप्यांतला

---

**ओळी** : २०३ उमा–पार्वतीनें शंकराच्या प्राप्तीसाठीं हिमालयांत व्रत केलेली कथा ' कुमारसंभवां 'त कालिदासानें वर्णिलेली आहे. तींतच पार्वतीला उमा हें नांव त्या व्रतामुळेंच कसें पडलें तें सांगितलें आहे :
" उमेति मात्रा तपसा निषिद्धा ।। पश्चादुमाख्याम् सुमुखी जगाम् ।।"
२१२ सुरेख कुप्यांतला–फुलांतील.

ललना-हृदिं कीं ओतो रस तो ललिता कला
सांग होई असा तैं त्या सुंदर व्रतिंचा तई
पारमार्थिक तो तैसा हा प्रापंचिक हेतुही !

* * *

ज्याचे भाव सुमांच्याची सुगंधांवरतीं असे
वाढले, बिसतंतूंच्या राजहंस वरी जसे;
ऋजुत्व, शुचिता, दैवी सात्त्विकत्वाहि कां हवें
त्या मनाचें पुसाया ? त्या भ्रूकौटिल्यहि कां शिवे ?
शांत तद्दृष्टिसी सारी सृष्टि शांतिमया गमे
रूपीं यौवन तोंही ती बालताच हृदीं रमे
रूपें, कुलें, वयें होता रुचला पति जो तितें
वेशींत यौवनाच्या कीं विशींत शिरला कुठें
सासूनें धाडितां वाढू, गवाक्षीं झणीं ये जधीं,
सन्मुखीं चुकुनी येतां पथें एकाचि वा कधीं
सुंदरीं सुंदरीची त्या दृष्टादृष्ट घडे जरी
कन्यके **कमलेच्या** त्या तरी सात्त्विक अंतरीं;
देवमूर्ति तशी जी कीं पूजनार्थचि निर्मिली
चंद्रलेखा तशी जावी जी दुरूनचि प्यायली
मनींच जपली जावी गायत्रीच-अशाहुनी
काय भाव दुजा यावा पतिमूर्तिस पाहुनी !

* * *

वाढवा जो नवीनाचा आजि तो सण पाडवा
शुभे, हो शिव हें तूतें नवें वर्ष, ऋतू नवा !

---

**ओळी** : २१४ अन्वय : ललिता कला ललना-हृदिं रस ओतो. २२० इतर कौटिल्य ( कपट ) तर राहोच, पण यौवनसहज असें निष्पाप भ्रूकौटिल्य ( नयनचांचल्य ) देखील तिला शिवलें नव्हतें. २२५ गवाक्षीं—खिडकींत. २२६ सन्मुखीं—समोर.

आशा, आशा तशा आजी उष्णशीतल मानवा
शुभे, हो शिव हें तूतें नवें वर्ष, ऋतू नवा !
पिक गाती वसंताचा ऐक मुंजुल गोडवा
शुभे, हो शिव हें तूतें नवें वर्ष, ऋतू नवा !
नवी तिथी, नवा मास, नवें वर्ष, ऋतू नवा
आजि कां मिरवावी ना रूपश्रीहि नवी तुवां !

होती लावण्यलक्ष्मीची नित्य पाहत ती छबी
सासूसही प्रभातीं त्या तरी ती दिसली नवी;
शंकाही ये मनीं आशा आणी उत्सुक अंतरीं
मायशी ती तरी सासू इतुकेंचि वदे वरी,
"केसांहीं मोकळ्या बाले, जाई बाहिर ना, मला
पाडवा आज काढूं दे बैस दृष्ट तुझी जरा !"
वेणी घालावया सासू हौसेनें मग जैं बसे
कांहीं चिंतितची तोंही मधींच खुदकन् हंसे
"हंससी कमले कां तें ?" "नाहीं, एक पडे मशी
स्वप्न काल मजेचेंची : माझी ती नलिनी जशी

सराच्या उजव्या बाजू नाहीं काय ? जिच्या कळ्या
पहिल्याच बहाराच्या झाल्याहेत फुलावया ?
—ती आणि मी जशा गेलों शोधूं तत्प्रियसा अली
उषःकालाचिया एका बसूनि झुळुकेवरी,
गेलों गात, 'तुझीची ज्या वाट पाहत राहिल्या
ये, शिलीमुख ! ये, स्पर्शें फुलवीं चल या कळ्या !'
आला लुब्ध अलीही तों !—सोडुनी नलिना परी
मेला माझ्याचि ओंठाला दंश येउनिया करी !

---

**ओळी :** २३५ आशा—दिशा. सर्व दिशा त्या दिवशीं मनुष्याला आशेसारख्याच सुखदशीतोष्ण भासतात. २५६ शिलीमुख—भृंग. हें विशेषण इथें साभिप्राय आहे.

स्वप्न हें नलिनीला तों असे मंगल ना परी ?”
सासूचे ती सुखाश्रूही पाहती वळती तरी !
स्वप्नार्थ हृष्ट होताची, हृष्ट त्याहुनिही परी
अजाणपण बालेचें तीतें मोहवि अंतरीं
वेणी होतांच सासू दे जी पाठीवरि त्या दिशीं
थाप ती आइच्या लागे चुंबनाहुनि गोडशी !
कैशोरांतूनि ज्यानें ना यौवनांतचि घेतली
विद्यार्थित्वांतुनी विद्वत्तेंतही पदवी परी,
कुशाग्रबुद्धि तो तीचा कमनीय पती घरा
आईच्या आग्रहें आला कराया सण साजरा
पुष्पमाला गुढीसाठीं होती गुंफित ती जिथें
उद्यानांत, युवा पाही गवाक्षांतुनि तो तिथें—
पाहीं; अले ! जपूनी कीं ही मनोभव-पंजरीं
फसवो न वसंताची तुला मोहक मंजरी !
आणि धीर सुटे सारा; आजि निश्चियलें मनें
तिच्याशीं पहिलेंची तें लज्जाव्याकुल बोलणें :
आईस चुकवोनीया, धीर एकवटूनिया,
गनीमी धरसोडीनें येत जात टपूनिया,—
आला ! आला तिच्या पार्श्वीं ! येतांची परि सन्मुखी
नीट आला तसा गेला शब्दही निघतां न कीं !
जाणेंचि तें परी घाली मूक प्रश्न तिला, अणी
पृच्छे त्या अश्रुता 'हो, हो!' उत्तरें उठलीं मनीं !

**ओळी** : २६० वळती तरी—वळली असती तर. २६१ स्वप्नार्थ : त्या यौवनोन्मुख बालिकेच्या शारीरिक स्थित्यंतराचें प्रतिबिंब मानसिक व्यापारांतही नकळत कसें पडत चाललें होतें तेंच नलिनीच्या 'पहिल्या बहाराच्या कळ्यांविषयीं' हें तिचें स्वप्न सूचित करीत होतें. ही कौतुकास्पद गोष्ट तिच्या प्रेमळ सासूच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं. २७७ पार्श्वीं—बाजूस.

उठे वरी, बघे खालीं, रंगे गाल, सुई गळे;
सुमासम गमे कांहीं हृदयीं तिज बोंचलें !
सासूपासूनि चोरावी गोष्ट ती पहिली अशी
अशान्त पहिल्यानेंची तिचे लोचन त्या दिशीं
मिष्टान्नें जेववी सासू मिष्ट त्याहुनिही परी
चुटपूट मघाची ती लागली उभयान्तरीं !
तिसऱ्या प्रहरींही ती करमे न म्हणूनिया
जाई जाइजुईवेलीलतांत विहरावया
तीरच्छाये सराच्या तों लाडक्या बकुलें तिला
लव वांकवुनी शाखा प्रेमें आडविलें जरा;
"काय तें ?" ती पुसे स्नेहें कुरवाळित त्याजला
बालिका, "बकुला, सांगें, लाजावें न तुवां मला !"
वाचलें जें कधीं त्याची स्मृति होउनि अंतरीं;
"–कोण जाणे, परी बाई, वदती कवि तें जरी
अहा सत्य !" मनीं भावी ती द्रवूनि–"न मी तरी
माझिया बकुलाचें तें कोण कोड पुरें करी !–
कौतुकें आणि सौहार्दें, तन्वी त्याचि सरांतली
चूळ घे भरुनी आणि टाकि त्या बकुळावरी !
लज्जा करी कसेंसेंची, पाही कोणि न ये तरी,
भरी चूळ, पुन्हां पाही, पुन्हां टाकि, पुन्हां भरी !
तोंचि सर्सरलें कांहीं कुंजांतूनि ! पहा पहा !
कोण तो कमले, येई ! चोर ओळखिचाच हा !

---

**ओळी :** २८२ अर्थात् तिला नकळत फुलधनु मदनानें तिच्यावर सोडलेला पहिला फुल-बाण हृदयाला ओझरता लागला ! पण तिला मनांत फुलासारखें कांहीं बोंचलें इतकेंच वाटलें. कारण तिचीं सुखदुःखें, उपमान–उपमेयें फुलांच्या जगताबाहेर अजून पडलीं नव्हतीं. २९४–२९६ बकुलवृक्ष हे त्यांच्यावर कामिनीनें चूळ टाकिली असतां फुलतात असा कवि-संकेत आहे. तो कुठें तरी वाचल्याची तिला अस्पष्ट आठवण झाली.

आला; सांभाळ आला ! हां; थांब रे, क्षणची तरी;
असावधावरी घाला रीत ही न तुझी बरी !
धरिलाचि परी पक्षी ! वार्द्धक्यें अजि आंधळी
वदतीच नभोवाणी ' धर्मयुद्ध न हें ' तरी !
चोरट्या कटिला गुंफी कांपता कर तो झणीं,
लाजऱ्या लागती गाला ओठ लाजत त्याहुनी !
साचीकृतानना, लज्जाचित्र हृद्य अशा तईं !
प्रियेच्या पहिल्याची तो चुंबनासि युवा पिई !

प्रियेच्या पहिल्याची हे लज्जाचंचल चुंबना,
कोण प्राणी जगीं कीं जो विसरेल तुझ्या क्षणा !
असूनी पल जो पाजी चुंबना तुझिया रसा
शताब्दांहुनिही होई तरी अपल तो कसा !
तुझ्यांत दिव्य जी चोरी, गार जो चटकाहि कीं
त्वरा थांबविती, सक्ती इष्ट, संमति जी मुकी;
चुंबना पहिल्या, दे ती सुखमादकता जशी
प्रियाननार्पिता मद्यांमाजिही न पुन्हां तशी !
उगीच रुसुनीया ज्या आत्ां आणुनिया घरीं
अंतस्थ बोलण्या देती आम्हां संधिहि ना पुरी
पदीं शरणचिठ्ठीही टाकितां इतरा जनां
चोरुनी, तीवरी जाती पाय देउनि : चुंबना !
–मानिनींसाहि त्या स्वप्नीं दिसे मूर्ति तुझी अणी
मूल्य चंदनपद्मांचें विपणींत चढे झणीं !

---

**ओळी** : ३०९ साचीकृतानना–जिनें तोंड वळवलें आहे अशी. ३१३ पलक्षण, श्लेषानें जो पळतो, चटकन् निघून जातो तो. ३१४ अपल–न पळणारा, स्थिर. ३२४ प्रियसंगमाच्या स्वप्नामुळें विरहानें मन पुन्हां व्याकुळ होऊं लागतें. विरहताप शांत करण्यासाठीं चंदनाची उटी आणि कमलांची शेज यांचा आश्रय करावा लागतो. त्यामुळें त्या द्रव्याचा खप वाढल्यानें त्यांचें मूल्यही चढूं लागतें. विपणींत–बाजारांत.

स्नेहशून्य सहारे जे आयुष्यांतिल घोर रे
विवासनीं अशा जेव्हां जीव व्याकुल हा झुरे;
किंवा विणी कसें जाळें कोळी हीच मजा जिथें
काळ-खोलींत बंदीच्या तैं तिथेंहि सख्या, तिथें,
प्रियेच्या पहिल्याची हे मुग्ध-प्रेमल चुंबना !
तुझीच स्मृति जावोनी भेटवी विरही मनां !
वाजे कांहीं ! अली झाला चुंबुनी पळता अणी
कळी स्पर्शसुखौत्कट्यें ती भेदोन्मुख तत्क्षणीं !
पुसे हळूचि सासूसी “ पोटीं कां उठती कळा ? ”
पोटीं का हृदयीं ! मुग्धे, अद्यापि न कळे तुला !
कळा न शशिलेखे, ह्या ज्योत्स्नेच्या फुलल्या कला !
मधु-प्रतिपदा होवो मधु प्रतिपदा तुला ! !

* * *

प्रातःकाळीं उषा तैशी रंगे सून सुमंगलीं
तिच्या वत्सल सासूच्या कोण उत्सव अंतरीं !
वेली कल्पप्रसूनांची सून साजत, होतसे
कोठें ठेवूं अणी कोठें न ठेवूं तिजला असें
देहधर्म नवाची तो, तें बाजू बसणें दुरी,
शिवतां न जनाचें तें जाणें पाहुनि सत्वरी
ओशाळे युगपत्स्थित्यंतरें तन्मन, होतसे

---

**ओळी :** ३२५ सहारे–निर्जल वाळवंटाचीं ओसाड मैदानें. आफ्रिकेच्या सहाऱ्याप्रमाणें मानसिक सहारे. ३२६ विवासनीं–देशत्यागांत. ३२८ काळखोली-यमपुरींतल्या खोलीसारखी. ३३१ अली–भ्रमराचें तिला पडलेलें स्वप्न ज्यानें खरें केलें तो तरुण. ३३५ ज्योत्स्नेच्या–यौवन-ज्योत्स्नेच्या. ३३६ मधु–वसंत. मधुप्रतिपदा-पाडवा. प्रतिपदा–दर पावलीं. मधु–गोड. पाडवा तुला दर पावलीं गोड होवो. ३३७ सुमंगलीं–ऋतुप्राप्तीच्या शारीरिक व धार्मिक संस्कारांनीं. ३४३ ओशाळे – ओशाळलें.



ाचीकृताननना, लज्या-
चित्र हृद्य अशा तई
प्रियेच्या पहिल्याची तो
चुंबनासी युवा पिई !
३०९-१०

अनोळखी जनीं जावें चुकलें चुकलें तसें
सासूचा तो परी आश्वासवी हर्ष झणीं तिनें
कीं जें हर्षद सासूशी शुभची असणार तें
प्रेमाशीर्वचनांचा तो वर्ष न्हाणवलीवरी;
तिचाच न परी होई हर्ष थोर घरोघरीं
सुरम्य मखरामाजी रमणी मग जैं बसे
श्लोकांत कालिदासाच्या उपमाच तशी दिसे !
पौर बालांगनांचें तों रम्य मंडल दाटलें,
ज्यासि त्यासि तिची सेवा करूंचि लव वाटलें
काढी रंगावली कोणी, गुंफी हार कुणी, कुणी
मांडी फेरमेरें, कोणी हंसवी तिज हांसुनी;
वाढणीं गृहिणी नेती, वाद्यें मंगल वाजती
वांटिती अत्तरें, देती कुंकुमां कुसुमां किती,
सधूप रुचिरें पात्रें नैवेद्यासम मांडुनी
"घेच घांस तरी" ज्या त्या प्रार्थिती कर जोडुनी;
मांगल्य-देवताची तैं शोभे त्या ललनांत ती,
मंदिराचें तया येई स्वरूप मखराप्रती !
परंतु तो युवा येतां व्हावें जातिलसें कधीं !
जातांच तो परी व्हावें कधीं येतिलसें हृदीं !!
आणि काय करावें हो त्यानेंही ! वरच्यावरी
वस्त्र, पुस्तक कांहीं ना राहे कांहिं तया स्थलीं !
थाट त्या मखराचा, तें दाट मंडल भोंवतें
सलील ललनांचें, ते भाव नूतन मोहिते,
परंतु शकलीं हीं ना सर्व विस्मरवूं तया
तिच्या आवडत्या वेलीफुलांच्या विरहास या
तत्तोषा तत्सखींना तैं सिंचितां भरतां जलें
तिची न तितुकी सेवा लतांची करणें पडे !

ओळी : ३४७ वर्ष – वर्षाव

येतां सुंदर रंगांचीं मखरीं फुलपांखरें
गमे बागचि त्यां धाडी बोलावूं मजला त्वरें !
स्वच्छंद त्यां रमूं देई पात्रीं भावित सुंदरा :
"जेवीं यथेष्ट हे माझ्या फुलांच्या फुलपांखरा !
आणि जा सांग जावोनी सुदुःखित अंतरीं
तुम्हांहूनि, लतांनों, हा वियोग कमले करी;
सुकतील लता स्पर्शें थोरांचें वच हें दुरी,
दिन दोन तुम्हांसाठीं तुमच्या कमले करी !"
आणि न्हातांच ती बाला चवथ्या दिवशीं सुटे
जशी झुळुक उद्यानीं कुठेच्या हरवे कुठे !
बाल्यीं बागेंत तैशी कीं रमे हांसत खेळतां;
परी बकुल तो येतां–अहा रे मदना हता !–
गालांवरी गुलाबांचीं जुईचीं सहसा फुलें
मनांतूनि कुणी मारी तसें मंजुल लागलें ! !
आधींच लाडका आणि यच्छायेंतचि तें दिलें–
नव्हे हो, चोरट्यानें त्या बळें चुंबन घेतलें !
दुहेरी प्रिय तो ऐसा बकुल प्रमदे तधीं
चूळ, चुंबन, ती भेदोन्मुखता, स्मरवी हृदीं;
आणि पुष्पवतीचें त्या मन शंकित जाहलें
टाकितां चूळ बालेला येती वा बकुला फुलें !

**ओळी** : ३७३ भावित–मनांत असें म्हणत. ३८४ लागलें–फुलधनू मदनाच्या मनांतून मारलेल्या फुलबाणांचा नेम या वेळेस पुष्कळच अचूक ठरला गालावर गुलाबांच्या नि जुईच्या रंगांच्या लहरी उसळल्या. ते सुखद फुलबाण यावेळीं असे नेमके लागले. पण गोड 'लागले' (वाटले). ३८९ पुष्पवतीचें–कन्यकांच्या चुळीनें बकुल फुलतात असें समजून तिनें मागें बकुळावर चुळी टाकल्या. पण त्यासरशीं तीच 'पुष्पवती' ऋतुमती झाली. तेव्हां तिला आपण तो कविसंकेत वाचतांना चुकून उलटा अर्थ समजलों कीं काय म्हणून शंका आली !

–आणि लज्जितही किंचित् कीं ऋतूंत सुवासिनी
जशा पुष्पलता तैशा न कां पुष्पवती जनीं !
मुहूर्तीं मग जैं धर्म्यीं शांति मंगल योजिली
आणि माहेरिंची आली सर्वही प्रिय मंडळी
त्या दिशीं पूर्णसौख्या ती ! एके ठायिंच कीं शके
माहेरीं सासरीं आणी उद्यानीं निवसूं सुखें !
अरुणासम दंपत्या तरुणा शुभ त्या दिनीं
दुकूलवसना सालंकृता सत्वर आणुनी
एकासनींच होमा जैं बसवीति तया क्षणीं
जोडपें तें खुले जैसें चंद्र आणिक रोहिणी !
दक्षिणार्चि हुताशीं जैं हवी देववितां तिला
पुरोहित वदे, लावा करा स्वपतिच्या करा,
करा तैं अंगुली कांहीं कर अंगुलिंना शिवे
ओष्ठांचें ना तसें लागे मिष्ट चुंबन हें नवें
लज्जेनें हलका आधीं, प्रेमधीट पुढें परी
मधें मधें करीं देतां दाब किंचित अंगुली
वादिका चतुरा कीं ती वीणादण्डचि तो शिवे
तारांतुनी हृदांच्या दों मंजुगीति नव स्रवे !!
शुक्राच्या चांदणीमाजी जसा सूर्य तसें तधीं
अंतर्धानासि घे अग्नी दीप्ति ठेवुनि तीमधीं

---

**ओळी :** ३९१–९२ जशा ऋतूंत पुष्पलता सुवासिनी ( सुगंधि ) होतात तशा जनीं ऋतूंत पुष्पवती ( ऋतुमती ) ललनाही ( सुगंधि ) कां होत नाहींत असें वाटून तिला किंचित् लाजल्यासारखें झालें. ३९३ शांति–ऋतुशांतीचा धार्मिक संस्कार. ३९५ मागच्या १९१–१९६ ओळी पहा. ४०१ दक्षिणार्चि हुताशीं–यज्ञाग्नींत ( हुताशीं ); ज्वाला दक्षिण दिशेकडे जाऊं लागणें ( दक्षिणार्चि ) हें शुभ समजतात. ४०५–८ त्याच्या हातास मध्येंच हळुवार दाब देणाऱ्या तिच्या अंगुलींच्या सकंप स्पर्शांनीं त्यांच्या हृदयांच्या तारातारांतून एक अननुभूत मंजुल गीती स्रवूं लागली.

चौकीं रंगावलीमाजी तों चौरंगहि चंदनी
चौफुले ज्या रुपेरी तो रुंद सुंदर मांडुनी,
न्हाऊं घालावया नारी नेति तैं उभयां तयां
गच्च्यांतुनी वरी दाटे जन मौज पहावया
नाना तेलें सुगंधी त्यां लावाया अपुल्या करीं
लागली ललनांची तैं चढाओढ कितीतरी
सुखस्पर्श जलांचा तों धो धो वर्षचि जाहला
गच्च्यांतुनी, वरी दोघां सुमांचा पडला सडा
कुणी त्याकरवीं तोया फेकवी लव तीवरी
टाक चूळ कुणी तूंही हळु आग्रह वा करी,
फेकी फुलें, करी कोणी रंग घालुनि केशरी
लपूनी पिचकाऱ्यांचा मारा मंगल त्यांवरी
खालीं सज्जांतुनी येतां, जातां खालुनियां वरी
युवतीयुवकांची तैं कोण धांदल हांसरी !
हास्यीं वामास्वनामाजी त्या युवस्वन लागले
स्वरांत सनयांच्या कीं जसे मंजुळ चौघडे !
त्या ऋचा, मंत्रची ते कीं, नवीन अभिषेचिती
प्रेमसिंहासनीं सम्राट् काम तो आणि ती रती !
युवकायुवतींचीची अशी धांदल ना परी
वृद्धही बालसे होती हांसते वरचेवरी
न्हातां एकासनीं ऐसें किती चोरियलीं तरी
अंगें स्वयेंचि अंगांसी लागताति परस्परीं;
मऊमऊ असें कांहीं मऊ तें सुख लागलें
धरींचि वक्षि तो तीतें-झोंक जाउनियां बरें !
पडद्यांत गुलालाच्या, जळांच्या गळत्यामधीं,

---

**ओळी** : ४२७ – कामराज्याभिषेकाच्या संस्कारांत तरुणी याच मूर्तिमंत ऋचा व तरुण हेच मूर्तिमंत मंत्र होत. ४३५ गळत्यामधीं–धारांत.

घेववे न तिला दे ती संधि साधुनि तो तधीं
अशी परिचिता होतां प्रियमूर्ति अनुक्रमें
दुरोनी नच, ओठांहीं घ्यावी चंद्रकला गमे !
आले आहेर, तीं झालीं पुण्य ब्राह्मणभोजनें,
रचिली सुयशय्याही नव ती युवतीजनें
चकवूनि तिला नेती तिथें जैं सहसा तधीं
हांसल्या युवती तीच्या धडकी भरतां हृदीं !
वधू-विभूषणा लज्जा ने तिला पळवूनि ते
माय आणि तिची सासू मायशी बसल्या जिथें:
तों तिथेंच युवाही तो सहसाचि दिसे तिशी !
येतां एकेक ना येती संकटें जगतीं अशीं !
हांसूनि कौतुकें, प्रेमें पोटाशीं धरुनी तिला
सासू वदे, वदे आई कुरवाळुनि त्याजला,
" लाजूं नकाचि, बैसा या, एकत्रस्थितसे तुम्हां
डोळे भरूनि पाहूं द्या प्राणची अमुचे अम्हां !"
पाहुनी जोडपें दोघी अशा सद्गद कीं हृदीं
कोण आई अणी सासू दोघांही न कळे तधीं
" पितृदेव **मुकुंदाचे** असते जरि या दिनीं
कोण हर्ष अशी होता सून सुंदर पाहुनी !"
" आणि बाई अजी माझी असती विमला जरी
मेहुण्याच्या किती ती या कौतुका करिती तरी !"

---

**ओळी :** ४३८ मागील २२९–३२ ओळींचा संदर्भ येथें अभिप्रेत आहे. ह्या संस्कारांतील एक हेतु हा प्रियपरिचयाचा अनुक्रमच असतो. ४४४ मायशी–आईसारखी,मायाळू. ४५३ मुकुंद–हें त्या तरुणाचें, कमलेच्या पतीचें नांव. त्याचे वडील लहानपणींच निवर्तले. ती व्याकुल आठवण त्याच्या आईस झाली. ४५५–कमलेची विमल नांवाची बहीण तरुणपणींच निवर्तली. तिची आठवण कमलेच्या आईलाही व्याकुल करती झाली.

उत्सवांत असे त्याच्या नसे तें स्मरुनी हृदीं
आनंदाश्रूंतही त्यांच्या दुःखाश्रू गळले तधीं !
वयस्य जो मुकुंदाचा आबाल्यप्रिय, त्या पला
तिथें मुकुल तो येई वाजूं देत न पाउला
पाठीमागूनि ना देतां कळूंहि कमलेचिया
लोचनांसी धरी हस्तीं झांकुनी ललितां तयां :
" नांव घ्या, वहिनी ! नेत्रां मग सोडिन ! ना अधीं !
कलींत न, उधाराची प्रथा सत्ययुगामधीं !
बरें, मुकुंद घेतां तें मग घेशिल तूंहि ना ? "
तिचें मौन वदे कीं तो संधि संमत तन्मना
नांवें लाजत घेतांची मुकुंदकमलाहि तीं
त्यांच्या मातांहुनी होई हाचि हर्षित तैं किती
बाहू बाहूंत गुंफोनी तेज : प्रेम–गुणीं–वयीं–
समान सुहृदांची ती जोडी जाउं उठे जईं
खोडसाळ पुन्हां तैं तो वळूनि डवचूं तिला
वदे मुकुल कीं कैसा डाव साधुनि घेतला;
" लग्न कीं तुमचें होतां मीही घेइन पाहुनी "
स्नेहघोर प्रतिज्ञा ही कूजे तीहि तया क्षणीं.
राजीव-लोचनांची त्या गुणरूपमनोहरां
जोडी जिवलगांची ये विश्रमूं मग त्या सरा
औदासीन्यें तईं कांहीं मुकुंद मुकुलाप्रती
वदे "होइ कसेंसेंची मन्मनीं : हुरहूर ती
कशाची न कळे लागे ! उत्सवास्पदिंही मती
रमे न दिनिं ह्या आतां !" "खरेंचि रवि हा किती "
हंसे मुकुल-" छद्मी वा मूर्ख ! कीं असल्या दिना

ओळी : ४६४ प्रथा–चाल. ४६६ संधि–तडजोड. ४७४ कूजे–लाडिकपणानें म्हणाली. ४७९ उत्सवास्पदिं–उत्सवाचे दिवशीं.

रेंगाळतो जसा गेहीं अनाहूतहि पाहुणा !”
मर्मी परी मुकुंदाच्या विनोद शरसा शिरे
वदे, “ असाचि हा का मी कामी ? तें अथवा खरें !
हें पहा मुकुला, मातें तुजहूनि जगामधें
स्थान संपूर्ण विश्वासा वद का वसतें कुठें ?
पिता निवर्ततां माझा सान मी असतां वयें
मोठें मला लहानाचें जाहली करिती स्वयें,
असे आवडती ऐशी आई ही : परि कीं पहा
मर्यादेनें न येती ज्या सांगतां तिजही, अहा
कामिनीसहि किंवा ज्या अशा कोमल भावना
सांगण्या सुहृदाहूनी स्थान अन्य न यौवना
पुण्य वा पाप वा सांगें मनीं जें तुज मी झणीं
तुझ्यापासुनि चोरावें, पाप अन्य न याहुनी
आबाल्य **मुकुला**, तूं मी एकजीव परस्परीं
अभिन्नहृदय स्नेहें, भिन्नदेह असूं तरी
तुवां मला न, कीं तूतें सोडिलें क्षणही न मी;
छाया जशी तसे होतों आम्ही संतत संगमीं
सुभाषितें, प्रमेयें वा शास्त्रांचीं स्मरती किती
विशिष्ट प्रियशीं कीं तीं वाचिलीं तव संगतीं
संगतीं झुंजलों म्लेंच्छांसह राष्ट्ररणीं सदा
भोगिल्या संगतीं साऱ्या संपदा आणि आपदा
निजलों उठलों संगें, वेष संगत सारखे
ओळखूं न जनां आलों कोण कोण असे निकें
माझ्याविना कधीं ज्यानें सुख ना उपभोगिलें
आजि त्या तुज सोडूनी भोगूं का सुख एकलें !—
संगाचें कामिनीच्या मी ? सुहृद्द्रोह असा तिच्या

---

**ओळी** : ४८२ अनाहूत – न बोलाविलेला.

रूप लंपटतेचें दे मंगला ऋतुशांतिच्या !
म्हणुनी अससी कीं तूं अविवाहित जोंवरी
लाडक्या कमलेसीही स्पर्श मी नचि तों करीं
किंवा त्वद्वाक् पृथा होवो ! कथो जें कथिलें तिनें !
पुण्यीं अलौकिकीं प्रेमीं तुच्छ लौकिक बंधनें !
आमुची त्यांवरी तैशी प्रीति संमति अंतरीं
प्रेमलेकमलेच्याही निर्विशेष अम्हांवरी
वृत्ति कोमल जी पाचां पार्थां व्याकुलवी तधीं
हृदा व्याकुलवी ह्याही !" "अहा रे सखया कधीं,"
वदे मुकुल मध्येंचि साश्रु गद्गद "पावना
प्रेमाच्या या तुझ्या फेडूं शकेन तरि का ऋणा ?
बंधु ना, ना स्वसा ज्यातें, ना मातापितरेंहि कीं
मृत बालवयींची तीं आजि आठवती निकीं,
त्या मला सर्वही तीं तीं प्रेमें दिव्य पुन्हां परी
लाभलीं ज्या तुझ्या लोभीं, मुकुंदा, तुज त्या जरी
साख्य, सौख्य तरी मातें ! तुझें मंगल तेंच कीं
मंगलप्रद मातेंही ! सखया बघ आणखी
अविवाहित मीही जों तूं व्रतस्थचि तोंवरी
होशी मदर्थ : माझी ती लाडकी कमला परी ?
फुलाहूनी चमेलीच्या हृद्य हास्य जिचें सदा;
संन्यस्त तूं असा होतां रतिच्या पहिल्या पदा
आगींत फूल तें जाई हाय ! होरपळूनि कीं !
फुलासि फुलल्याहूनी पाहतां जळतां सुखीं

---

**ओळी :** ५११ पृथा-कुंती. ५१५ वृत्ति—ज्या सुखापासून आपले आत्मीय बंधु वंचित आहेत तें सुख आपण एकट्यानेंच कसें उपभोगावें हा जो प्रेमळ संकोच पांची पांडवांना द्रुपदकन्या कोणी वरावी या प्रश्नाचे वेळीं व्याकुळ करता झाला तो भाव.

मातावें जें असेंची का असे निर्घृण राक्षसी
मुकुंदा, मन हें माझें ? हाय रे, अणखी तिसी–
अलौकिक असें अस्मत्सख्य पाहुनि होय जी
समान लेखुनी आम्हां आईचि मजला दुजी–
मुकुंदा, जननोसी त्या तुझ्या, ही तुमची अशी
वेल निष्फल वंशाची बघवेल तरी कशी !
तुला कचितची ठावें मातांचीं हृदयें किती
ऋतुस्नात स्नुषेसंगें घेतां पुत्र सुसंगती
आल्हादा पावती कोण्या अपृथक्करणीयशा :
वशीकृतजगत् का ती वंशसातत्यलालसा :

भावी ऐहिक सौख्याच्या आशा वा शुभभूतिची
श्रेयाची वा परत्रा ती नवी निश्चितता दुजी:
यौवनाच्या अशान्तीच्या शान्तिची स्मृति कीं तई
आपुलाल्या सुमिष्टा वा कळतां न विमोहवी :
किंवा केवल पाहूनी तनयासि सुमंगलीं
अहेतु हर्ष जो रोमांचितवी तनु तत्पलीं :
वृत्ति सर्वचि किंवा या : परि कीं जननीजना
उत्कंठा सुतभुक्ता ती सून सुंदर पाहण्या !
त्यांतही कीं पिता ज्याचा बालत्वींच निवर्तला
कुला एकुलताची जो आधार प्रिय राहिला

रजाचा गज जो केला असा नंदन लाडका
पुण्यशय्ये स्नुषेसंगीं सेवितां प्रथमा सुखा :
अत्युल्हासीं तया तैं रे गमतें जननी–हृदा

---

**ओळी** : ५३१ मातावें–मत्त व्हावें. ५४२ पुत्रपौत्रांकडून पितृतर्पण, श्राद्ध, पक्ष इत्यादि धर्मकृत्यें संपादिलीं गेलीं तर पितरांना तें परलोकीं श्रेयस्कर होतें, ह्या निष्ठेमुळें पुत्रालाही जेव्हां संतान होतें तेव्हां वंशसातत्याची ती दुहेरी हमी मिळून पारलौकिक श्रेयाची निश्चितता दुणावते.

आजन्मभुक्त कष्टांची लोभाची कृतकृत्यता !
त्यांतही आपुल्याची वा आईच्या तुझिया पहा
सुखाचा कमलेच्याही प्रश्न केवळ काय हा ?
न सख्या अनिरुद्धाचा एक केवल कीं परी
अशेषजनसौख्याचा पाळणा रतिच्या घरीं !
अशेष-जन-सौख्या दे धर्म तोचि वदे श्रुती :
धर्मदा शर्मदा देवी रति – ना सुखदाचि ती !
राष्ट्रसेवेप्रती झालों व्रतबद्ध तया अम्हां
रामदासीय दासांही तरी धर्म सुपूज्य हा

ओजस्विवीर्य–गांधर्व-विधिनें अथवा अशा
पूता वेदी विवाहाची वाढवी निजराट्यशा !"
"मुकुला, मग तूं कां ना विवाह करिसी तरी ?"
"तुझ्यासम न कीं मातें आत्मप्रत्यय अंतरीं
यद्यपी राष्ट्रधर्माचा बीजमंत्र विवाह रे :
गंगाचि आटतां गंगास्नानपुण्य कसें घडे ?
परंतु परतेची जैं आपदा प्रियभू छळी
धर्मार्थची सख्या, होती आपद्धर्म तदा बळी
अर्धभुक्तचि तैं अर्धांगीच्या बाहुलतेंतुनी
होय रे सखया, जाणें हाय ह्या विषमीं रणीं

भीति धीटहि तैं द्याया प्रीतिचा असल्या हवी :
चळती अचलांचींही शिखरें पडतां पवी
पुण्यही श्लाघ्यही होती तैं वैवाहिक बंध रे
आत्मदुर्बल जे माझ्यासम, घातुक त्यां त्वरें

---

**ओळी** : ५५६ श्रीकृष्णाचा पुत्र मदन; त्याची पत्नी रती; तिचा तनय अनिरुद्ध. या कथेचा संदर्भ येथें आहे. ५६२ पूता वेदी–पवित्र स्थंडिल. ५७२ चळती–डळमळतात. पवि–वज्र.

रोग्यां पौष्टिक तैसें त्यां रतिमंगल वर्ज्यसें
प्राप्तची न तयाचा कीं त्याग दुष्करसा नसे
अल्पधर्मी महद्धर्मा न चुकोत करावया
म्हणूनि विहिताची कीं अविवाहितताचि यां
परंतु जो मनस्वी हे दोन्ही धर्म शके करूं,
कामिनीच्या कटाक्षांहीं जातां येइ न जो धरूं

धर्मवीर्यत्व तीसंगें ज्याचें लुप्त न, जो परी
तिलाच अपुल्या संगीं धर्मवीर्यवती करी
धन्य धन्यचि तो धीमान् धर्मवीर चितोरचा,
राजीवाक्ष अयोध्येचा, तान्हा भरतभूमिचा !
तूं मुकुंद, तसें व्हावें, होऊं तूं क्षमची तसें,
विश्वास हा मनीं माझ्या, आकांक्षा मज ही असे !
आमुची देशभक्ती तों निर्नदीकसरोपमा
तुझी जयांत जन्मा घे गंगा संतत त्या समा !
धर्मार्थ एकची त्यागूं आम्ही प्राण : तुम्ही परी
कांता, सुता, स्वतः आत्मत्याग हा त्रिगुणें तरी !

ध्येय मी राष्ट्रभक्तीचें क्वचित् : जीवन हो तुझें
पितृत्वाचें पतित्वाचें ध्येय राष्ट्रसुभक्तिचें ! !
व्यक्ति-सौख्यचि तूं माझें काय तें पुससी तरी :
मत्सखा मत्सखी तूं ती संगमूनि परस्परीं
द्विधा प्रीति अशी माझी मिश्रा काम-रसायनीं
धृतैकतनु कीं यावी चुंबितां कुरवाळुनी !

---

**ओळी :** ५८४ तान्हा—वीर तानाजी. ५८५ तूं तसें होऊं क्षमची—तूं तसें होण्यास समर्थच आहेस. ५८७ आमुची—अविवाहित देशभक्तांना संततिरूपानें देशभक्तांची संतत परंपरा निर्मिण्याचें पुण्य लाभत नाहीं. वाहती नदी उत्पन्न न होणाऱ्या सरोवरासारखें तें जीवन होय. ५९० त्रिगुणें—तिप्पटीनें. ५९६ धृतैकतनु—त्यांच्या अपत्यरूपानें.

शुद्ध-सांचित-तेजस्वि-काम्यवीर्य कुमार तूं
योग्य दीक्षित कामाचा सांग हा करण्या क्रतु !
धर्माज्ञा, जा ! मदाज्ञा, जा ! माझीचि कमला हृदीं
ठेव जा ठेवशी आलिंगनाच्या कुलुपामाधीं !!"
"मुकुंदा, मुकुला ! " ऐशा हांका मंजुल तों तिथें
नाचनाचतची येती बाला सुंदर आणि ते :
आईनें जी मुकुंदाच्या प्रेमानें प्रतिपाळिली
**प्रेमला** कमलेची कीं सुभगा भगिनी जुळी
"मुकुंदा, मुकुला !" बोले ती, "आलां छपुनी न रे
एकली सोडुनी मातें ? आतां जाल कुठें बरें !
कुठें कुठें" तया एक्या कमलें वदनावरी
मंजु मारित ती ताल प्रश्नांचा अपुल्या धरी
मुकुंद "कमलांचा कीं," वदे "गंधचि गोडसा
परी आज कळे त्यांचा स्पर्श त्याहुनिही तसा !"
"खरें, खरें !" हंसे व्यंगें चतुरा "कळलें तुला
न्हातांना तें ? अणी रातीं तें कळेल पलोपला !
गोड गोड असा ज्याचा स्पर्श लागतसे तुला
त्या तुझ्या 'कमलें' ची कीं असे धाडियलें मला
'ताजीं ताजीं फुलें वेचूं' पुसें मी अणि जैं तितें
'कशासी कमले गे तीं ?' तैं किनी मज ती वदे :
'सांजे जाणें न का देवदर्शना मज सत्वरी
श्रीराममंदिरीं !' 'ना श्रीकाममंदिरिं : सुंदरी
कमले, कामदेवाच्या दर्शनासि !' हंसूनि मी
वदें तों, मुकुला, भारी रुसे ती—मानिं तोषुनी !"
"श्रीरामपूजनीं आम्हीं पाहिली तुज ना कधीं
अशी तत्पर तूं पुष्पें वेचूं आजि तरीच तीं !

---

५९८ क्रतू—यज्ञ. दीक्षित—यज्ञदीक्षा घेतलेला.

रुससी ? प्रेमले, आतां तूंच ना वदलीस कीं,
कामपूजन हें आजी ? वेच, वेच, निकीं निकीं"
हंसे मुकुल "कीं भाते पूर्ण पुष्पधनू तरी
कमलेसचि ना विंधूं, शकोचि तुजही परी!"
तों क्रोध कोण ये! जातीं तीं सुमें चिरडूनि कीं
दिसूं उष्ण शिवूं शीत ज्वालाची सुटली निकी :
वांक ते लव ते लाखों! अहा कोण शके धरूं
जातां वेलीलतांतूनी उडतें फुलपांखरूं!
"प्रेमले, प्रेमले," हांका मुकुंदें मुकुलें किती
मारिल्या विनत्या केल्या, ऐके कोण तयांप्रती!
जाती तिला धरूं दोघे, परंतु चपला झणीं
निसटेचि पुढें : त्यांसी प्रेमें कर्षित मागुनी
"घे तरी चुकलों, याचूं क्षमा, थांब!" असें तिला
वदतांच पदीं ओंचा गुंततांहि न गुंतला :
आणि ती धरिली त्यांनीं! सस्वेद परि भाल तें
उन्हांत मुकुलाचें ती पाहुनी बहु हांसते
"श्रमें, मुकुंद, याही ये घाम या मुकुला तुझ्या :
बोलसी वीर हा गाढा रणींचा उदगीरच्या!"
"मीच का प्रेमले," बोले मुकुंद "रण-दक्षते
स्वयें वीरवर श्रीमान् भाऊ त्या अवलोकिते :
जैं घुसे त्यांचिया शब्दासहची शरसा झणीं
पाडी म्लेच्छांचिया सेनानेत्याचें धड हा रणीं!"
"असेल पाडिलें," लीलावती ती हंसली, "धडा :
छाटिलें आधिंची कीं तें असेल कुणि तच्छिरा!"
"शीर्षहीनहि होऊं दे, पाडिलें धड मीं तरी :
भरेल तुज तों पाहूं धडही धडकी परी!"

---

**ओळी** : ६२९ लव–लवलवणें. ६३७ सस्वेद–घाम आलेलें.

हंसे मुकुल ऐसें; तों त्या सावेश विलासिनी
वदे "दे बघुं ती मातें तलवार तुझी झणीं !
दुर्गा तशीं रणीं घेतें मंडलें बघ ! दे मला
तेजस्वी तो अणी घोडा श्रीमंतें दिधला तुला "
"तोचि घे, तोचि हो घोडा प्रेमले! तुज घेउनी
पुढें, जोडिस बैसूं जैं वरातीस मिळे कुणीं !
तलवार परी माझी ? ते दुर्गेसमची जरी
हस्त आठ तुला होते पेलती तुज ती तरी !"
"पुरे हो तें पुरे" ओढी करा ती मुकुलाचिया
बाही सारूनिया त्याची, गुंफुनी स्वकरीं तया,
वदे हांसत "ये तूंची, मुकुंदा, वद तत्त्वता
कीं या जोड-करांतूनी कोणाचा कर कोणता!"
आणि कैशोर-कोंळें जें गोल, गोंडस, गुंफलें,
निष्कलङ्क करांचें ती उचलूनि धरी जुळें :
त्यांत रूपें कळे कैसें कोणाचा कर कोणता
कैशोर–कुड्मलामाजी स्त्रीपुंकेसर झांकतां !!
"कोणता कर कोणाचा" मुकुंद हंसला "अहा,
प्रश्नची हा नुरे वेडे या पाणिग्रहणें पहा !"
शुकसारस मैना तों मोर बुल्बुल बोलले,
"ठीक ठीक! स्वयंपाणिग्रहीं द्वित्व कसें उरे !"
"अर्धाङ्ग हाहि, ही अर्धाङ्गिनी, यांसि अनंग तो
पूर्णैकाङ्ग करो!" आले वारे मंजुळ गात तों :
संकल्प झारिनें कारंज्याच्या सोडिति अप्सरा :
पिलांचा इंद्रचापांच्या थवाही बहु नाचला :

---

**ओळी** : ६५२–श्रीमंतें–पेशव्यांनीं ६६६ ·पाणिग्रहण–हात धरणें, श्लेषार्थी वरणें. ६६८ स्वयंपाणिग्रहीं–आपण होऊनच पाणिग्रहण केल्यावर ( स्वयंवरानंतर ) दुजेपण उरतेंच कुठें !

मंगलाष्टक-गीतें तों गाती कोकिल : ढाळिती
ताज्या गुलाबपाण्यासी गुलाबलतिका किती :
अत्तरांच्या कुप्या तैशा आपुल्या उघडूनिया
मालती निशिगंधांच्या कलिका सरसावल्या :
फेकिती अक्षता वेली फुलांच्या : तरु डोलले :
"अर्धाङ्गिनी, अहा, अर्धाङ्गिनी" बुल्बुल बोलले:
सृष्टिची सगळी तीतें विनोदें हंसतां अशी
प्रत्युत्तरें तिनें द्यावीं कवणा कवणा कशीं !
आणि त्यांत कळे ही ना, सृष्टि बाह्यचि हें वदे
अंतःसृष्ट्युत्सवासी कीं तिच्या केवळ साद दे !!
तों वरी मखराचीया कोंवळ्या कदलींतुनी
लवूनी कमला पाहे जसा चंद्र नभांतुनी
"आल्यें, आल्यें! मला सोडा! बोलावी कमला!" भलें
विनोदसमरा सोडूं मानानें तिज फावलें!
घेउनी तिज मध्यें; ते तिघेही मग चालले
तिनें कटीसि दोघांच्या गुंफितां कर कोंवळे

* * *

रात्र होतां, फराळासी जोडपीं नव बैसतां
तांबूल तोडतां ओठीं गोड ओठहि लागतां
असा दिनभरी भावें देव जो नव अर्चिला
मनोभव मनीं साक्षात् प्रभु प्रकट जाहला !
ती स्व-स्व-प्रथमर्तूच्या शांतीची स्मृतिही अणी
कामव्याकुल तैं साऱ्या करी कामुक कामिनी
पूजका प्रमुखाची जी मदनोत्सव-मंदिरीं
त्या व्रतांची व्रतस्था ती कोमला कमला परी ?

---

**ओळी** : ६८१ साद—पडसाद. ६९२ मनोभव—मदन. ६९६ त्या...परी—पण त्या व्रतस्थ कोमल कमलेची मनःस्थिति काय होती ?

तों वरी मखराचीया
कोवळ्या कदलींतुनी,
लवुनी कमला पाहे
जसा चंद्र नभांतुनी
६८३-८४



—गूढ अद्भुत कांहींसें घडणार अतां खरें :
अतर्क्य सौख्यभीतीचीं हृदयंगम वादळें :
लज्जा अकृत्रिमा देहीं दे स्वेदोद्गमही जरी :
सत्त्वशीलवतीच्या त्या तरी सात्त्विक अंतरीं
जडसें विषयीं ऐसें तमोपहतसें नसे
किमपीहि शिवावें हो तिला अशिव तें कसें !
तिच्या आवडत्या त्या त्या लतांचीं विणिलीं फुलें
प्रेमलेनें जई तीच्या अलकीं अपुल्या करें :
पाचमाणिकमोल्यांचे अलंकारहि टाकिती
तन्मुखावरुनी ओंवाळुनी स्वकिरणें जधीं :
नमस्कृता वदे आणि श्वश्रू चंबुनि ती जंव
“ अष्टपुत्रवती वत्से, जा ! सौभाग्यवती भव !”
झणीं तो तंव तच्चित्तीं सासूचा प्रिय “ जा अतां ”
नवीन जगतें दिव्यार्थाचीं जागवि ऐकतां !
शुभाशीर्वचनांचा तो वर्ष न्हाणवलीवरी :
त्या देवमंदिरीभूता पूजा ती मखरांतली :
ती होमदीप्ति, ते धूम स्वच्छ, आहुतिगंध ते,
श्रुतिमंगल ते दिव्य श्रुतिमंत्र निनादते,
अभ्यंगस्नान तें, अंगस्पर्श, तीं ललनास्मितें,
पुण्य ब्राह्मणपंक्ती त्या, दक्षिणादिक दान तें,
आहेर ते, विडे ते, ते उखाणे, फुलसेज ती,
आल्हाद इष्टमित्रांचा, अलंकारवित्या सती :
सोहळ्यांहीं विधींही ह्या तया न्हाणवलीवरी
पृथक् पृथक् मनीं झाले जे संस्कार पलोपलीं :
होतांचि स्पर्श त्या “जा” चा प्रेमपावन–सर्व या

---

**ओळी :** ७०१ तमोपहत–तामस, अमंगल. ७०४ अलकीं–केसांत. ७१४ निनादते श्रुतिमंत्र–ते वेदमंत्रघोष

धीरोदात्तैकसंस्कारीं जाती एकवटूनिया !
कीं देवांहीं द्विजांहींही महत्कार्य करूं म्हणीं
निर्वाचिता मला केली नियुक्ता मजसी अणी !
इष्ट जें पितरांचें, जें इष्टवी अखिला मही
जयाच्या विजयासाठीं व्हावे लुब्ध विरक्तही,
लोककल्याण साधूं तें—सुख केवल ना—परी
अग्निसाक्ष सख्यासंगें कायसें व्रत मी धरीं !
गोत्रर्षींचें समर्पूनी नवप्रतिनिधित्व तें
निघालेंचि अहा ही मी जाऊं "जा" वदती तिथें !

सोल्हास ती अणी जाऊं निघालीहि तिथें—परी
कासया कमले ?—हा रे मदना ! गति खुंटली !
लोटिली ती सख्यांनीं तों बळेंचि पतिमंदिरीं
पुढें मन, पदें घेतां मागुती वरचेवरी !
लाविलीहि कडी त्यांनीं : द्वारा व्यर्थचि मारिशी
मुग्धे, धके ! न तूं ऐकें पदांचें, परि जा कशी
ऐक तूं स्वमनाचेंची कमले कमनीय, जा—
प्राणवल्लभ बोलावी, जा, युवा तिकडे तुझा !
पुण्यमंचकशय्या ही : बैस बैस शुभे, न भीं :
चुंबितां कां मधेंची तूं राहसी सुटुनी उभी !

बैस सेजेसि ये तूं ये : स्वयें जनककन्यका
स्पर्शली जीस ती झाली रतिसेज न धन्य का !
देहधर्म कसासाची ? पावने, प्रकटे अजी
स्वर्गंगा जीवनाची ही, हे गंगोत्रि तुझ्यांत जी !
ओपी हिरण्यगर्भा त्या स्वयंभू भगवान् स्वयें
नारांत ज्या झरा त्यांचा नारि एक तुझ्यांत ये !

---

**ओळी** : ७३९ न भी : भिऊं नकोस. ७४१ जनककन्यका—सीतादेवी. ७४५—७४६ नारा—मूलबीज धारण करणाऱ्या पाण्यांना नारा म्हटलें आहे. आपोनारा इति प्रोक्ता :—मनुस्मृति. अप एव स सर्जादौ तासु बीजमवासृजत्. स्वयंभू भगवानांनीं त्या 'नारां'मध्यें तें सृष्टीचें तेजस्वी मूलबीज स्थापिलें ही कथा येथें अभिप्रेत आहे.

तीर्थांची उगमा घेई तीर्थता सुजनांत, ते
तुझ्यांत तूं : ऋतुस्नाते, तीर्थतेसहि तीर्थ तें !
तरि घाल फुलांची ती माळ त्या आणि नंतरीं
फुलांहूनि मऊ माळा करांची निज सुंदरी !
फुलांहूनि मऊ आणी साखरेहुनिही मिठी
कंठीं कोमल त्या घालीं प्रेमाची प्रमदे, मिठी !
गोड गोड मिठी ? वेडे, पुढें त्याहुनिही अहा
आलिंगनामृतीं गोडी : पिउनी तर तूं पहा !
अंगीं अंगीं समालिंगीं, विलंब पल ना करीं :
कीं असामान्य गे देवी, पल हा ! असल्या पलीं
—सांगावें तें कुणी कीं गे नसतीलचि तीं उभीं
मंडलें नाग-कन्यांचीं पाताळीं अणखी नभीं
अप्सरांचीं धरूनीया करीं मंगल आरत्या :
लावुनी सनया ओंठा देवदूततर्तीहि त्या,
प्रतीक्षत पळा ह्याची धन्य ! याच पळा क्वचित्
वर्णितील कवी भावी ‘ शुभशंसि ’ ‘ प्रसन्न-दिक् ’ !
कीं कल्याणि, पलीं या जीं ओवुनी हृदयें हृदीं
प्रेरी अनंग पेराया अमृतें अमृतामधीं
–सांगावें कुणि !-त्या दिव्या पेरणींतचि संभवा
घेणें असेल एखादा घनश्यामल राम वा :
कालेंचि ना गुणेंही जो ठरे आद्यकवी महा–
कवींत वसुधेमाजी, आजी त्यासम अन्य हा

**ओळी :** ७५१ मिठी–मिठास, मिष्ट. ७६० तती–वृंद. ७६२ ‘ बभूव सर्वं शुभशंसि तत्क्षणम् ’ आणि ‘ प्रसन्न दिक्पांसु विविक्तवाता : ’ असे कालिदासाच्या श्लोकांतील शब्द उल्लेखित आहेत. महापुरुषांच्या संभवाच्या स्वागतार्थ अशा घटना घडतात, असे पौराणिक संकेत आहेत.

वाल्मीकि वा : कुणी गीता-द्रष्टा वा नव सारथी :
वाग्मी बृहस्पती : शिल्पी मय, भीष्म महारथी,
किंवा मदालसा, मुक्ता, मीरा वा विदुला कुणी
लावण्याची लता किंवा उमा देवविमोहिनी :
वा कुणी विश्ववेधांचा मनु भास्कर नूतन :
आश्चर्यांच्या अजिंठ्याचा निर्माता, नट, नर्तन
नाट्यकार कुणी किंवा लोकीं अद्भुतसा नवा :
आसन्नमृत्यु राष्ट्रेंची राष्ट्रें ज्या प्रतिभेंत वा
नवजीवन पीती तो चंद्रगुप्त : अमात्य तो,
विक्रमादित्य वा ज्याचा म्लेच्छां विक्रम मर्दितो :
हिंदु छत्रपति श्रीमान् शिव वीरवराग्रणी
गुरुगोविंद वा बंदा धर्मवीर नवा कुणी—
मंगलाची परा सीमा ! पेरणींतचि संभवा
घेणें असेल या दिव्या देवभूमि तुझ्यांत वा
जन्मजन्मांतरींची यत्तपःसिद्धि फलोन्मुखा
राहिली या क्षणाचीची वाट पाहत उत्सुका
आत्मा अंतिम जन्मा तो मुक्त भोगुनि व्हावया
बुद्ध, जझिस वा जीवनन्मुक्त देहुंतला तया !!
प्रेयाचा स्वर्ग गे स्वर्ग श्रेयाचाहि लुटूं तरी
सख्या समुपभोगीं तूं घट्ट या हृदयीं धरीं
न अंग सुभगे चोरीं : निर्विकल्प समाधितें
बीजसाधन हें कामासन ! तूं रत हो तिथें !
आणि पंचशरा, ये ये : पंचही शर या पळीं
मार रे सुकुमारीं या मन्मथा मिथुनावरी !
झटशील असें साधूं शुभची सुमकार्मुका,

ओळी : ७७० वाग्मी—वक्ता. ७७३ धर्मशास्त्राचे आद्यस्मृतिकार जसे मनु, तसे विश्ववेधांना नियमबद्ध करणारे ज्योतिषशास्त्राचे आद्यस्मृति-कार—भास्कराचार्य. ७७७ अमात्य—चाणक्य.

काम, कामा, तरी तूझा करी शंकर राग कां ?
घेच संमोहनास्त्राही घेच खेंचुनि या पलीं
मुकुंदकमला, घे घे समाधिस्थ परस्परीं !
विमानांत अहा आलिंगनाच्या रतिमूर्च्छितां
उंच उंच अनंगा, ने सुखाच्या गगनांत त्यां !
मंजु मंजुलगीतांच्या नव निर्झरती सरी
चंद्रिका-चंद्रकांतांचे रस स्नेहरसांतरीं ! !
हांसल्या लतिका आशीर्वाद मंगल तेधवां
शुभे, हो शिव हें तूतें नवें वर्ष, ऋतू नवा !
प्रेयाचा स्वर्ग सोडोनी सुखाच्या गगनांतुनी
कर्मभूमि पुन्हां येसी हेंचि कीं सुचवूं झणीं
भीत भीत दुरोनीयां वारे वाहत जात ते
अश्वांच्या थयथयाटाची ध्वनिती पडसाद ते
"अश्व ?" सुस्पष्ट ह्या टापा ! "कुणाचे ?" सहसा कसे ?
तोंच शय्यागृहद्वारीं थापही हळु येतसे !–
"मुकुंदा !" थाप आली ना दार तों उघडूनिया
मुकुंद ये, करीं स्नेहें करा घे मुकुलाचिया
"स्मृति प्रिय तुझी आतां होती होतचि; ये अहा !"

---

**ओळी :** ७८६ देहूंतला जीवन्मुक्त–तुकाराम. ७९६ परस्परीं–ध्यानसमाधींत स्वतःचें मन स्वतांतच समाधिस्थ होतें. पण त्या कामसमाधींत मनें अन्योन्यीं रममाण होऊन परस्परीं समाधिस्थ झालीं. ८०२ मागें २३३-३९ ओळींमध्यें दिलेला आशीर्वाद असा त्या शब्दांच्या दोहीं अर्थी आज खरा ठरला ! तिथें 'नवें वर्ष ऋतु नवा' ह्याचा कालवाचक शब्द आणि ऋतु हा अर्थ मुख्यार्थ होता : इथें त्यांचा श्लेषार्थ अभिप्रेत आहे. नव्या ऋतुच्या मंगलशांतीप्रीत्यर्थ होणारा हा चंद्रिका, चंद्रकांताच्या स्नेह-रसांचा आंतर 'वर्ष'–वर्षाव शिवास्पद होवो, असा अर्थ. ८०६ ध्वनिती–ध्वनित करितात.

"प्रिय ना, अप्रियची ये कथिण्या हतभाग्य हा
मुकुंदा, तूंचि वाचीं ही राजाज्ञा! मज दर्शनीं
निघणेंचि रणा," "आणी मलाही, तरि, या क्षणीं!
रणीं ना पडले शिंदे? मराठा तरि कोणता
दत्ताजींच्या न सूडासी जातां राहिल मागुता!"
"मुकुंदा, त्यांतही शत्रू म्लेच्छ येथिलची कुणी
दुर्वार्ता ऐकुनी ऐशी पुंडाई करण्या झणीं
रानांत होत आहेती जमा याचि, तयांप्रती
दंडायासी त्वरें आज्ञा श्रीभाऊ मज सोडिती
म्हणूनि या मुहूर्तींची छापा घालुनि तोडितों
असावधाचि या रानीं जों न संहत शत्रु तों
उद्युक्त अश्वसंघाचे आकळूनि लगाम रे
वाट पाहति आज्ञेची शिलेदार घुसूं पुढें:
रुसशील तसा जातां: म्हणुनी तुज भेटुनी
आलों जाऊं" "अणी मातें काय मागति ठेवुनी?
नाहीं, नाहीं, कधीं नाहीं! मराठा नचि काय मी!"
परी मुकुल ना बोले संकोचें हृदयीं श्रमी
अधोवदनची अंतीं प्रेमगद्गद तो पुसे
"जागी, मुकुंद, कीं माझी कमला निजली असे?"
"लागला लव कीं डोळा आतांची," "तरि केंवि तें
त्यागूं आतांचि ती व्हावें शिलानिष्ठुर या हृदें!
सुखस्वेदज बिंदूंची बिंदी डोलत राहिली;
प्रेमसेजे न जों आली नीज ही पहिली पुरी
तोंचि सोडुनि जावें त्वां मुकुंदा कमले कसें
फेंकावें तें कसें आगीमधेंचि कमला असें!"
"आगींतही असें फेकूं कमला न अयुक्त कीं

ओळी : ८२२ संहत–संघटित.

जरी प्रज्वलिली ती या देवकार्य-महामखीं !
मुकुला, सखया तूंची वदलासि सरावरी :
धर्मार्थची कधीं होती आपद्धर्म असे बळी !
शत्रु शत्रु दिशा दाही ! फिरंगाण तुराण तों
पर्यंत सेतुबंधाच्या जो जो म्लेंच्छ अहिंदु तो-
तो तो सर्व मिळूनीया उच्छेदूं उठला अहा
शिवछत्रचि, हिंदूंचा प्राणत्राण अनन्य हा !
अहिंदु उठला सारा !–हिंदु जो तितुका अणी
काय पाहोंचि तें शय्यागेहांच्या खिडक्यांतुनी !
उठो हिंदु उठो वा ना : मराठा तितुका तरी
आबालबालिका आतां मरो मारित संगरीं !
समर्थांची अम्हीं दीक्षा घेतली नचि का? झणीं
हातावरी शिरा तूंही घेउनी घुससी रणीं !
सरदारचि तूं वीरा, श्रीमंत प्रभु भाउचा :
तरी मीहि नसें का रे देहची दुसरा तुझा ?”
तोंचि शीळ हळू आली ! आली स्फूर्ति हृदीं, मुखीं
वीरश्रीची प्रभा आली वीरबाहु स्फुरोनि कीं
“अहा !” मुकुल तों बोले पाय टाकितची पुढें
“सर्व सिद्ध. असें सांगूं ऐक शीळ, सख्या, सुटे !
विलंब पल ना आतां शक्य ! हूं चल तूं !–परी
मातेसी वा बघूं ये ना पळही कमला पुरी !”
आणि सद्‌गद ते दोघे देवद्वारिं तसे झणीं
द्वारीं शय्यागृहाच्या त्या सकंप कर जोडुनी
वदे मुकुल “देवा, तूं अमुच्या कमले अणी –”
“आमुच्या प्रेमले देवा !” मुकुंद वदला झणीं :
“आमुच्या प्रेमले आणी कमलेप्राति” बोलती
दोघेही ते; “प्रभो, रक्षा ! प्रार्थना इतुकीच ती !!”



"...मुकुंदा, तूंचि वाचीं
ही राजाज्ञा! मज दर्शनीं
निघणेंच्चि रणा," "आणी
मलाही, तरि, या क्षणीं!"
८१३-१४

राजीव-लोचनांची ती यौवनोदयभास्वरा
जोडी जिवलगांची त्या साश्रुही करुनी त्वरा
निजल्या न जिन्यासीही कळतां उतरे जिने
उल्लंघिती गृहा-ज्या रे फिरुनी कधिं पाहणें!
उच्छृंखलाश्वसंघांचे लगाम सुटले ढिले
रान आलें, अहा झालें! स्वार ते सरसावले !
खिंकाळतो न घोडा वा स्वार श्वास न टाकितो
तळावरी पडे छापा रिपुच्या सहसाचि' तों !!
धडड धडड आगी बंदुका ओकती तों !
तळपति तलवारी एकची गर्ज होतो !
सुटुनि न घटि होते प्रेमशय्या जयातें
क्षण रण गमलें त्या - सत्यही स्वप्नसें तें !!
अणि भडकुनि शय्यादीप दावाग्नि माते,
वमति रुधिर-रंग प्रीतिचे ! बाग पेटे,
दयित ! बकुल ! हा रे क्रंदतां तो न भेटे,
शयनिं भिववि हीतें–स्वप्नही सत्यसें तें !!!

REFBK-0006901
REFBK-0006901

ओळी : ८६५ यौवनोदयभास्वरा–नव तारुण्याचे तेजानें तळपणारी. शय्या-दीप–शय्यामंदिरांतील दिवा. माते-भडके.

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिराची

# वाङ्मयीन आघाडी

**स्वा. सावरकर लिखित**

| | |
|---|---|
| हिन्दुत्वाचे पंचप्राण | ३-०-० |
| हिन्दुराष्ट्र दर्शन | ६-०-० |
| हिन्दुत्व | २-८-० |
| मला काय त्याचें ? | २-४-० |
| सिंहगड ( पोवाडा ) | ०-८-० |
| बाजी प्रभू ( ,, ) | ०-८-० |
| चाफेकर रानडे ( ,, ) | ०-६-० |

**शि. ल. करंदीकर लिखित**

| | |
|---|---|
| सावरकरांचे सहकारी | १-८-० |

**स. अ. शुक्ल कृत**

| | |
|---|---|
| लोक सिंहासन | १-८-० |

**ग. कृ. बोडस कृत**

| | |
|---|---|
| भगवा झेंडा | १-८-० |

**दोन रशियन कादंबऱ्या**

| | |
|---|---|
| बापलेक ( टुर्गेनिव्ह ) | ३-०-० |
| सिंहाचे छावे ( टॉलस्टॉय ) | ३-०-० |

**पिरोज आनंदकर कृत**

| | |
|---|---|
| बालबहिर्जी | २-०-० |

**मालती बेडेकर लिखित**

| | |
|---|---|
| पारध | १-४-० |

**बाळासाहेब शिंदे लिखित**

| | |
|---|---|
| सौ. रेखा | २-८-० |

प्राप्तिस्थल

**चित्रशाळा मुद्रणालय, प्रकाशन विभाग**

पुणें २.